# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## राजकीय विचार

# भारतीय राजकीय विचार

## विषय कोड : 86552

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य. डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबईई

**संपादक** : **डॉ. सविता भाऊसाहेब नागे**
निमंत्रित प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपति संभाजीनगर

**लेखक** : **प्रा. निलेश पाटील**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,
रत्नागिरी

: **डॉ. सविता भाऊसाहेब नागे**
निमंत्रित प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपति संभाजीनगर

**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राज्यांची कल्पना | १ |
| २ | राष्ट्रवाद | ११ |
| ३ | तर्कशुद्ध आणि मूलगामी सुधारणा | २८ |
| ४ | समाजवादी विचार | ३७ |

तृतीय वर्ष कला

सत्र - VI (CBCS)

राजकीय विचार

भारतीय राजकीय विचार

अभ्यासक्रम

**Semester VI– Indian Political Thought**

**Module 1: Ideas on State**

1.1MahadevGovindRanade (1842 – 1901)
1.2 Mohandas Karamchand Gandhi (1869 – 1948)

**Module 2: Nationalism**

2.1 Rabindranath Tagore – (1861 – 1941)
2.2 VinayakDamodarSavarkar (1883 - 1966)

**Module 3: Rational and Radical Reform**

3.1 Gopal Ganesh Agarkar (1856 – 1895)
3.2 BhimraoRamjiAmbedkar (1891 – 1956)

**Module 4 : Socialism**

4.1 Jawaharlal Nehru (1889 – 1964)
4.2 RammanoharLohia (1910 – 1967)

**Semester VI**

1.Ahuja, M. L.: *Indian Political Thought*, Dominant Publishers and Distributors, New Delhi, 2012. (Tagore, Gandhi, Nehru, Savarkar, Lohia)

2.Arora, V. K.: *RammanoharLohia and Socialism in India*, Deep and Deep Publishers, New Delhi, 1984.

3.Bakane, Chhaya: *PrakashKirana*, (Marathi) ShrividyaPrakashan, Pune, 2007

4.Bhole, B. L.: *'AdhunikBhartatilRajkiyaVichar'*, (Marathi) Continental Prakashan,*Pune*, 1998.

5.Chakrabarty, Bidyut and Pandey, Rajendra Kumar: *Modern Indian Political Thought:Text and Context*, Sage Publication, New Delhi, 2009. (Ranade, Phule, Tilak, Tagore,Gandhi, Nehru, Ambedkar, Lohia, Gandhi, Savarkar, PanditaRamabai )

6.Chaturvedi, Archana: *Indian Political Thought*, Common Wealth Publishers, New Delhi, 2006. (Ranade, Phule, Tilak, Tagore, Gandhi)

7.Nanda, B. R.: *Three Statesman Gokhale, Gandhi, and Nehru*, Oxford University Press, New Delhi, 2004.

8.Pantham, Thomas and Deutsch Kenneth L.: *Political Thought in Modern India*, Sage Publication, New Delhi, 1986.

9.Ray, B. N. and Mishra, B. K.: *Indian Political Thought: Readings and Reflections*, Kaveri Books, New Delhi, 2012. (Phule, Ranade, Tilak, Tagore, Nehru, Ambedkar, Lohia, Gandhi)

10. Singh, M. P. and Roy Himanshu (Ed.): *Indian Political Thought: Themes andThinkers*, Pearson, Delhi, 2011.

11. Desphande, S. V.: *'BhartiyaRajkiyaVicharvant'*, MangeshPrakashan, Nagpur, 1998.

12. Pandey, B. N.: *Nehru*, Rupa.Co., New Delhi, 2003 .

13. Ganachari, A.: *Agarkar: The Secular Rationalist Reformer*, Popular Prakashan, Mumbai, 2005.

# १

# राज्यांची कल्पना

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.४ न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे

१.५ मोहनदास करमचंद गांधी

## १.१ उद्दिष्टे

**"राज्याची कल्पना "** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. न्या. महादेव गोविंद रानडे यांचे राज्यसंबंधी विचार जाणून घेणे.

२. व्यक्तीवादी विचारवंत म्हणून न्यायमूर्ती रानडे यांचा अभ्यास करणे.

३. न्यायमूर्ती रानडे त्यांच्या विचारातील व्यक्तिवाद आणि आदर्शवाद या दोन्ही विचारसरणीचा समन्वय अभ्यास करणे.

४. महात्मा गांधींचे रामराज्य किंवा आदर्श राज्य समजून घेणे.

५. महात्मा गांधींची आर्थिक विकेंद्रीकरण संकल्पना समजून घेणे.

६. महात्मा गांधींच्या आदर्श राज्यात अनन्यसाधारण महत्त्वाचे सत्य व अहिंसा या तत्त्वांचा अभ्यास करणे.

## १.२ प्रास्ताविक

आदर्श राज्य म्हणजे असे राज्य की, ज्यामध्ये शासन आपल्या विविध योजनांच्या माध्यमातून जनतेला सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा पुरविण्याचा प्रयत्न करते. राज्याच्या सामाजिक सुरक्षेअंतर्गत आरोग्य, शिक्षण, रोजगार, गृहनिर्माण आदी क्षेत्रात विविध योजनांच्या माध्यमातून सामान्य जनतेला सुविधा पुरवणे व सहाय्य करणे हे आदर्श राज्य करण्याचा प्रयत्न करते. राज्य जर कल्याणकारी असेल तर या राज्याच्या सामाजिक सुरक्षा योजनांचा फायदा समाजातील गरीब, कामगार, नोकरदार , अल्पसंख्याकांना मिळतो. असे राज्य सामाजिक जबाबदारीची जाण असणारे राज्य म्हणून ओळखले जाते. असे राज्य सत्तेचे साधन न राहता समाजसेवेचे साधन म्हणून कार्य करते. जनतेचे कल्याण गृहीत धरून राज्याकडून विविध योजना आखल्या जातात आणि साधनसंपत्तीचा योग्य वापर केला जातो.

अशा आदर्श राज्याची कल्पना न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि महात्मा गांधी यांनी मांडली. त्यांनी आपल्या विचारातून सार्वजनिक कल्याणाचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात येण्यासाठी अखेरपर्यंत प्रयत्न देखील केले.

## १.३ विषय विवेचन

आज एक परिपूर्ण राज्याच्या कल्पनेला जगातील सर्वच राष्ट्रांमध्ये महत्त्व प्राप्त झालेले आहे; परंतु ही कल्पना मात्र नवीन नाही. राज्यातील सर्व नागरिकांच्या हिताचे संगोपन, संवर्धन आणि संरक्षण व्हावे हा विचार प्राचीन काळात पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विचारवंतांनीही मांडलेला दिसून येतो. महाभारतातील शांती पर्वत राज्याचे स्वरूप कसे असावे याबाबत विचार मांडलेले आहेत.त्यात सत्तेचे संरक्षण ,नैतिक जीवनासाठी मार्गदर्शन आणि वास्तव्यासाठी योग्य आणि सुखदायक प्रदेश या तीन गोष्टी सांगितलेल्या आहेत.

पश्चिमात्य विचारवंतांनी देखील राज्याच्या व्यापक कार्यक्षेत्राचा विचार केलेला दिसून येतो.कालांतराने राज्याच्या कार्य कक्षा विस्तारत गेल्या आणि आता कल्याणकारी राज्याची संकल्पना जगातील सर्वच भागांमध्ये स्थिर झालेली आहे. आजच्या घडीला राज्य ही काही मूठभर श्रीमंत समाजाची मक्तेदारी राहिलेली नसून, मागासलेल्या गरीब,अप्रगत राज्यांमध्ये देखील आज कल्याणकारी राज्याच्या दिशेने वाटचाल करण्याचा विचार प्रभावी ठरतो आहे

## १.४ न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे (१ ८६९ - १ ९४८)

न्या.महादेव गोविंद रानडे हे एक थोर समाजसुधारक, इतिहासकार, नेमस्त, उदारमतवादी विचाराचे, अर्थतज्ञ, धार्मिक आदर्शवाद आणि तात्विक उदारमतवाद यांचे थोर प्रवर्तक, विधिज्ञ व मातृभूमीबद्दल उत्कट प्रेम असणारे महान वैचारिक नेते होते. त्यांच्या महान कार्याने आणि व्यापक अशा विचारांनी फक्त महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतभर ते लौकिकप्राप्त ठरले आहेत. त्यांनी भारतातील सामाजिक, राजकीय, धार्मिक परिस्थितीचा सर्व बाजूंनी जवळून अभ्यास केला. राजा राममोहन रॉय यांचे अधुरे कार्य पुढे चालवण्याचे श्रेय न्या. महादेव गोविंद रानडे यांना जाते.

महात्मा गांधी यांनी गोपाळ कृष्ण गोखले यांच्याबरोबरच न्या. रानडे यांनाही आपले गुरु मानले होते, तसेच काँग्रेसचे संस्थापक ॲलन ह्युम हे न्या.रानडे यांना राजकीय गुरु मानत होते. काँग्रेसच्या स्थापनेपासूनच तिच्या कार्यात न्या.रानडे यांचा महत्त्वाचा वाटा होता. काँग्रेसची घटना तयार करण्यात न्या. रानडे सहभागी झाले होते.भारतीय इतिहास आणि संस्कृती यांचा न्या.रानडे यांना अभिमान होता तसेच उत्कट अशी देशभक्तीची भावना होती. त्यांच्या ज्ञानाचा आणि बुद्धीचा आवाका जबरदस्त होता, म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचा सॉक्रेटिस म्हटले जाते.

**राज्यसंबंधी विचार: व्यक्तिवाद आणि राज्याचे स्वरूप व कार्याबद्दलचे विचार:**

न्या.रानडेंची व्यक्तीची स्वायत्तता आणि स्वातंत्र्यावर नितांत श्रद्धा होती. राज्यसंस्थेला ते श्रेष्ठत्व प्रदान करत असले तरी व्यक्तीच्या स्वातंत्र्याला स्वयंसिद्ध व अंतर्भूत मानत होते. राज्य व समाजाने व्यक्ती स्वातंत्र्याचे मोल जपले पाहिजे यावर भर देत. राज्यसंस्था व्यक्तीच्या सदसदविवेक बुद्धीचे प्रतिनिधित्व करत असते. व्यक्तीचे खरे स्वातंत्र्य सदसदविवेक बुद्धीच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत असते. रानडे व्यक्तीवादाच्या आधारावर स्वातंत्र्याचे समर्थन

करीत असले तरी स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार घेत नाही. व्यक्तिवादी आणि उदारमतवादी विचारवंताप्रमाणे राज्याकडे तटस्थतेची आणि नकारात्मकतेची भूमिका सोपवत नाही. व्यक्तीच्या सुखी जीवनासाठी राज्याने प्रयत्न केला पाहिजे यावर ते भर देतात. राज्यात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करून खऱ्या अर्थाने शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे राज्याचे महत्त्वाचे राजकीय कार्य आहे. स्वातंत्र्याचा उपभोगायोग्य परिस्थिती निर्माण करण्यासाठी राज्याने कार्य करावे. राज्याने केवळ व्यक्तीविकासाच्या मार्गातील अडथळे दूर न करता व्यक्तीविकासाची विधायक जबाबदारी पार पाडावी. व्यक्तीला आपले हित कळत असल्याने तिला आपल्या विकासासाठी स्वातंत्र्य द्यावे. मिल, स्पेन्सर यांसारख्या विचारवंताच्या प्रभावामुळे व्यक्तीस्वातंत्र्याचा गौरव केला असला तरी व्यक्तीस्वातंत्र्याची सर्वांगीण विकासाची जबाबदारी राज्यावर सोपवलेली आहे.

सामाजिक उत्कर्षाला व्यक्ती स्वातंत्र्यामुळे बाधा उत्पन्न होऊ नये म्हणून स्वातंत्र्यावर बंधने लादण्याचा अधिकार राज्याला दिलेला आहे. स्वातंत्र्याला समाज व राज्याचे संरक्षण मिळवून देण्यासाठी नागरी हक्कांची मागणी रानडे करतात. रानडे यांचा व्यक्तीवाद हा उदारमतवाद आणि आदर्शवादाच्या संमिश्रणातून विकसित झालेला दिसतो. उदारमतवादाच्या प्रभावातून व्यक्तिवाद व स्वातंत्र्याचे समर्थन करतात आणि आदर्शवादाच्या प्रभावातून स्वातंत्र्याच्या उपभोगासाठी योग्य वातावरण निर्माण करण्याचे उत्तरदायित्व राज्याकडे सोपवितात. समाज आणि राज्याच्या कल्याणासाठी स्वातंत्र्यावर मर्यादा लादण्याचा अधिकार राज्याला बहाल करतात. व्यक्तिविकास आणि स्वातंत्र्य संरक्षणासाठी रानडे राज्याकडे पुढील जबाबदाऱ्या सोपवितात.

**राजकीय क्षेत्रातील कार्य :**

राज्य हे व्यक्तिविकासाचे साधन आहे यासाठी ते टिकवून ठेवले पाहिजे. न्या.रानडेंनी आधुनिक कल्याणकारी राज्याची कल्पना मांडली. या कल्याणकारी राज्याचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे, की जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण करणारे राज्य हे कल्याणकारी राज्य होय. व्यक्तीविकासासाठी राज्याने शांतता व सुव्यवस्था निर्माण करावी. परकीय आक्रमणापासून समाजाचे संरक्षण करावे. लोकांना न्याय उपलब्ध करून द्यावा. व्यक्तीविकासासाठी राज्याने स्वातंत्र्य उपलब्ध करून द्यावे. समाजात समतेचे तत्त्व प्रस्थापित करून व्यक्तीची गुलामगिरी व पिळवणुकीपासून सुटका करावी. तसेच व्यक्तीच्या भौतिक व अध्यात्मिक विकासाला अनुकूल वातावरण निर्माण करावे, लोकांना न्याय उपलब्ध करून देण्यास सोबत व्यक्तीला ज्या गोष्टी स्वप्रयत्नाने मिळत नसतील तर त्या गोष्टी राज्याने उपलब्ध करून द्याव्यात. न्या. रानडेंच्या राज्य विषयक चिंतनाचा सखोल अभ्यास केल्यास असे दिसून येते की, त्यांना राज्याकडून कल्याणकारी कार्याची अपेक्षा होती.

**सामाजिक क्षेत्रातील कार्य:**

न्या. रानडेंच्या मते, राज्याने व्यक्ती विकासाबरोबर समाजाचे कल्याण साधले पाहिजे. संपूर्ण समाजाच्या विकासाकरिता अनुकूल परिस्थिती राज्याने निर्माण करावी. भारतीय समाज रुढी, परंपरांनी जखडला गेला आहे. त्या प्रथा व परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न राज्याने करावा. पश्चिमेकडील भौतिक संस्कृती भारतात रुजवण्याचा प्रयत्न राज्याने करावेत. भारतात मोठ्या प्रमाणात जातीभेद, उच्च-निचता आणि स्त्रीला दुय्यम दर्जा असून वरिष्ठ जातीने कनिष्ठ जाती

व स्त्रियांना गुलाम केलेले आहे. त्यांना विचारांची संधी मिळत नाही, म्हणून राज्याने या व्यक्तींची गुलामगिरीतून मुक्तता करावी. भारतीय समाजातील विषमता दूर करावी व समाज व्यवस्थेतील अनिष्ट परंपरा नष्ट करण्यासाठी जनतेने स्वयंप्रेरणेने प्रयत्न केले पाहिजे. मात्र भारतीय समाजातील अज्ञान लक्षात घेता राज्याने कायदे करून समाज परिवर्तन घडवून आणले पाहिजे. समाजातील विषमता आणि भेदभावपूर्ण वातावरण नष्ट करण्यासाठी रानडे राज्य हस्तक्षेपाला मान्यता देतात.

**आर्थिक क्षेत्रातील कार्य:**

आर्थिक क्षेत्रात व्यक्तीविकासासाठी राज्यात व्यापक कार्य करता येण्यासारखे आहे. प्रत्येक व्यक्तीस आर्थिक हित समजते त्या आधारावर व्यक्ती स्वतःचे कल्याण साधू शकेल. व्यक्ती कल्याणातून समाजकल्याण आपोआप साधेल, हा आर्थिक क्षेत्रातील व्यक्ती स्वातंत्र्यवादी पाश्चात्य विचार रानडेंना मान्य नव्हता. रानडेंच्या मते, व्यक्तीच्या आर्थिक विकासाकरिता राज्याने हस्तक्षेप करावा. भारतीय समाजाचे दारिद्र्य दूर करण्यासाठी प्रयत्न करावे. भारत शेतीप्रधान देश असल्याने तो गरीब आहे, ही गरिबी दूर करण्यासाठी शेतीचे आधुनिकीकरण करावे. शेतीवरील भार कमी करण्यासाठी भारताचे औद्योगिकीकरण करावे.समाजातील दुर्बल घटकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत. भारतीय लोकांवर बसविलेल्या कराचा भार इंग्रजांनी कमी करावा. वस्तूंच्या उत्पादन व वितरणावर सरकारने नियंत्रण ठेवावे. सामान्य जनतेला योग्य किमतीत मुबलक वस्तू उपलब्ध करून द्याव्यात. भारतासारख्या अविकसित आणि मागासलेल्या देशाचा औद्योगिक विकास,शैक्षणिक विकास आणि सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारने उदासीन न राहता सक्रियपणे प्रयत्न करावे हा रानडेंचा आग्रह होता.

**सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य:**

न्या.रानडें भारतीय सांस्कृतिक मूल्यांचा आणि पाश्चात्य आर्थिक व सामाजिक ध्येयवादाशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करतात. संस्कार शिक्षणाने येतात म्हणून ब्रिटिशांनी भारतीयांना पाश्चिमात्य शिक्षण द्यावे. त्या शिक्षणात उत्तम नागरिकत्वाचे, पश्चिमी संस्कृतीचे दर्शन, परमसहिष्णुता, व्यक्तीबद्दल दया, प्रेम आणि सहानुभूती निर्माण करावी. अशा शिक्षणातून लोक आपली सामाजिक व राजकीय जबाबदारी पेलण्यास पात्र होतील. त्यातून व्यक्तिविकास आणि समाज विकासाला चालना मिळेल. सरकारने शिक्षणाबरोबर लोककल्याणाच्या दृष्टिकोनातून आरोग्यविषयक जबाबदारी स्वीकारून व्यक्तिगत आणि सामाजिक आरोग्याकडे लक्ष द्यावे.

**इतर क्षेत्रातील कार्य:**

न्या. रानडेंच्या मते, वरील कार्याखेरीज राज्याने सार्वजनिक सोयी उदा. पोस्ट, तार, रेल्वे, वजनमापे व नाणी इ. सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी स्वीकारावी. सरकारने समाज जीवनाच्या तसेच कारखान्यातील काम करणाऱ्या मजुरांची स्थिती यात वेतन, भत्ते, सुट्ट्या व आरोग्यविषयक सोयी, इ. बाबत नियम करून दैनंदिन जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करावे.

न्यायमूर्ती रानडे व्यक्तीवादी विचारवंत असले तरी त्यांच्या विचारात व्यक्तीवाद व आदर्शवाद या दोन्ही विचारसरणीचा समन्वय दिसून येतो. त्यांनी पोथीनिष्ठ व्यक्तीवादातील व्यक्तीच्या

अमर्याद आणि नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना मान्य केली नाही. त्यामुळे त्यांनी मानवी जीवनात राज्यसंस्थेला महत्त्व असले तरी व्यक्तीविकासाला अधिक महत्त्व दिले. व्यक्तीविकासासाठी राज्य हस्तक्षेपास मान्यता देऊन व्यवहार्य व्यक्तीवादाची मांडणी त्यांनी केली.

**आपली प्रगती तपासा :**

१ ) न्यायमूर्ती रानडे यांचे राज्याच्या कार्याबद्दलचे विचार स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

२) न्यायमूर्ती रानडेंच्या व्यक्तीवादी विचाराचे स्वरूप स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

३) न्यायमूर्ती रानडे यांच्या विचारांचे मूल्यमापन करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १.५ मोहनदास करमचंद गांधी (१ ८६९-१ ९४८) :

.भारतीय राजकारणाला सर्वाधिक प्रभावित करणारे नेते म्हणून महात्मा गांधी ओळखले जातात. ते एक आदर्शवादी व अध्यात्मवादी पुरुष होते. महात्मा गांधी प्रामुख्याने मानवतावादी होते. धर्म आणि राजकारण यांचे सुंदर मिश्रण त्यांनी केले. राज्यशास्त्राला त्यांनी आध्यात्मिक आधार दिला. व्यावहारिक राजकारणाला एक नवीन दृष्टी दिली. १ ९२० ते १ ९४७ हा कालखंड भारतीय राजकारणात 'गांधीयुग' नावाने ओळखला जातो. स्वातंत्र्य आंदोलनात कार्य करत असताना त्यांनी भारतीयांचे दैनंदिन जीवन, सामाजिक आणि राजकीय प्रश्नांवर मोठ्या प्रमाणावर लेखन करून आपली भूमिका विशद केलेली आहे. आपल्या नेतृत्वाद्वारे स्वातंत्र्यलढ्याला नवा आयाम मिळवून दिलेला आहे.  स्वातंत्र्य आंदोलनात अभिनव स्वरूपाचे मार्ग वापरले. अफाट ऊर्जा आणि सत्यनिष्ठेवर असलेल्या पकडीच्या जोरावर जनसामान्यांच्या गरजा आणि आकांक्षांशी संवाद साधण्याची असामान्य क्षमता रोखून कार्य करणारे नेते म्हणून गांधींचा विचार केला जातो. औद्योगिकीकरणातून जन्माला आलेल्या भौतिकवादी आणि चंगळवादी संस्कृतीला पर्यायी संस्कृती निर्माण करण्याचा विचार गांधींनी मांडला. त्यामुळे गांधींचे राजकीय विचार हे बहुआयामी स्वरूपाचे आहेत.

**महात्मा गांधीं यांचे राज्याविषयक विचार किंवा रामराज्य संबंधी विचार :**

वास्तविक गांधींची अराजकतावादी विचारवंत (Anarchist Philosopher) होते. सुखी जीवनासाठी राज्य आवश्यक आहे असे गांधीजी मानत नव्हते. राज्याच्या वाढत्या शक्तीकडे ते भीतीने पाहत होते. राज्य कायदाद्वारे जनतेचे शोषण कमी करते असे वाटते पण राज्यच मनुष्याला जास्त हाणि पोहोचविते. राज्यामुळे व्यक्तिगत वैशिष्ट्यांचा नाश होतो. व्यक्तीच्या व्यक्तीत्वावरच सर्वांगीण उन्नती अवलंबून असते. कोणतेही कार्य जेव्हा स्वेच्छापूर्वक केले जाते तेव्हाच ते नैतिक राहते. पण राज्य आज्ञा देत असल्याने त्याचे कोणतेच कार्य नैतिक राहत नाही. राज्य म्हणजे एक आत्महिन यंत्र आहे. राज्य हे साध्य नसून साधन आहे.'जे शासन कमीत कमी सत्ता चालविते ते सर्वोत्तम शासन' या **थोरो** या विचारवंताच्या विचाराप्रती गांधी आपली निष्ठा व्यक्त करतात, राज्यसत्तेप्रति आपली संशयित वृत्ती प्रदर्शित करतात. गांधींच्या राज्य विषयक विशिष्ट भूमिकेमुळे त्यांना अराज्यवादी विचारवंत म्हटले जाते परंतु अराज्यवादी विचारवंतांप्रमाणे गांधी राज्य पूर्णपणे नष्ट करावे याचे समर्थन करीत नाही. मर्यादित कार्यक्षेत्र व अधिकार असलेल्या राज्याचे समर्थन करतात. राज्याचे महत्त्व कमी करण्यासाठी ग्रामराज्य, रामराज्य वा अहिंसक राज्याची कल्पना मांडतात.

राज्यसंस्थेला विरोध करण्यामागे गांधीजींची प्रमुख भूमिका म्हणजे राज्य ही संस्था हिंसेवर आधारलेली असते. राज्याचा आधार दंडशक्ती असतो. राज्य दंडशक्तीच्या जोरावर कायदेपालन घडवून आणते, समाजाचे शोषण करते. त्यामुळे गांधी 'राज्याला आत्मा नसलेले यंत्र' मानतात. राज्याचा आधार इच्छा नसून शक्ती आहे. राज्यामुळे व्यक्ती स्वातंत्र्याचा नाश होतो. केंद्रीकरणाची प्रवृत्ती बळावते असे गांधींना वाटत असल्यामुळे ते राज्यविरहित समाजाची संकल्पना मांडतात. परंतु सद्यस्थितीत राज्य नष्ट करणे शक्य नसल्यामुळे अहिंसक राज्य, ग्रामराज्य आणि स्वयंपूर्ण राज्याचा पुरस्कार करतात.

**आदर्श राज्य / रामराज्य किंवा अहिंसक समाज:**

राज्य ही हिंसेवर आधारलेली संस्था असल्याचे गांधी मानतात. हिंसक राज्याच्या ठिकाणी अहिंसक राज्याची स्थापना करण्याची भाषा करतात. अहिंसात्मक राज्य व्यक्तिविकास आणि व्यक्ती स्वातंत्र्याच्या आड येणार नाही, कारण अहिंसात्मक राज्यात सर्व व्यक्ती परस्परांना सहकार्य करतील. प्रेम आणि स्वार्थ, त्यागाच्या आधारावर सामाजिक संबंध प्रस्थापित करतील. त्यामुळे व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी दंडशक्तीच्या वापराची आवश्यकता नसेल या परिस्थितीत राज्य संस्था अनावश्यक बनेल. गांधींच्या अहिंसात्मक राज्यात अहिंसा मूल्यास प्राधान्यक्रम दिलेला आहे. अहिंसेच्या आधारावर आदर्श राज्य व्यवस्थेची उभारणी करण्याचा प्रयत्न ते करतात. समाज स्वयंनियंत्रित व स्वयंशिस्तीवर चालेल, त्यामुळे व्यक्तिविकास आणि समाज नियंत्रणासाठी दंडशक्ती व बळाचा वापर करण्याची गरज नसेल. "अहिंसात्मक राज्यात जनतेवर कमीत कमी शासन केले जाईल. शासकीय नियंत्रणापासून व्यक्तीला मुक्त करून स्वशासनाच्या दिशेने वळविण्याचा प्रयत्न केला जाईल". गांधी त्याग, सत्य, प्रेम, सहकार्याच्या आधारावर समाजाची पुनर्रचना करून अहिंसात्मक राज्याची स्थापना करण्याचा प्रयत्न करतात. गांधींजी अहिंसात्मक राज्याचे पुढील आधार सांगतात.

## १ ) स्वयंपूर्ण ग्राम :-

देशाच्या उन्नतीसाठी गांधीजींनी ग्राम महत्वपूर्ण मानले आहे. प्रत्येक गाव स्वावलंबी राहील. सहकार्य हा त्याचा आधार राहील. गावातील लोक शांतीपूर्ण व गौरवशाली जीवन व्यतीत करतील. प्रत्येक गावात पंचायत राहील. अहिंसात्मक समाजाची स्थापना गावातच शक्य आहे. गांधींजी राजकीय शक्तीच्या विकेंद्रीकरणाचे समर्थक होते. गावातील पंचायत तेथील प्रशासन पाहील. प्रत्येक व्यक्ती स्वतःवर नियंत्रण ठेवील. दुसऱ्याच्या मार्गात अडचण बनणार नाही. आपल्या सर्व आवश्यकतांची पूर्ती करण्याची साधने ग्रामपंचायतीजवळ उपलब्ध राहतील. गांधीजींचा आदर्श समाज पिरॅमिड सारखा नव्हे तर गोलाकार राहील. व्यक्ती त्याचा केंद्रबिंदू राहील. गावातील कायदेविषयक, न्यायविषयक आणि शासनविषयक सत्ता ग्रामपंचायतीकडे राहील. वर्तमान व्यवस्थेतील शक्तीचे झालेले केंद्रीकरण गांधीजींना मान्य नव्हते. राजकीय शक्ती हे साध्य नव्हे तर साधन आहे. त्यामुळे खेडी स्वायत्त बनतील.

## २) आर्थिक विकेंद्रीकरणावर भर :

राजकीय शक्तीच्या विकेंद्रीकरणाबरोबरच गांधीजींनी आर्थिक विकेंद्रीकरणावरही जोर दिला आहे . उत्पादन साधनांच्या केंद्रीकरणाने आर्थिक विषमता निर्माण होते, त्यातून भांडवलदार व मजूर वर्ग निर्माण होतो. म्हणूनच गांधीजींना उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण नको होते. खेड्यामध्ये लघुउद्योग व कुटीर उद्योगांना महत्त्वाचे स्थान द्यावे. खेड्यातील लोकांना नोकरीसाठी इतरत्र जावे लागू नये असे गांधीजींचे मत होते. विकेंद्रीकरणामुळे यंत्राच्या प्रयोगावरही नियंत्रण शक्य होते. त्यामुळे कुणाचेही शोषण होणार नाही.

## ३) शिक्षण विषयक विचार :

गांधीजी शिक्षणाच्या माध्यमातून चांगला माणूस आणि चारित्र्यसंपन्न नागरीक घडविण्याचा प्रयत्न करतात. शिक्षण ही व्यक्तीचे शरीर ,बुद्धी व मन यांचा समतोल विकास साधणारे साधन असल्याने गांधींनी मूलभूत शिक्षणावर भर दिला. गांधीजींनी प्रारंभिक शिक्षणावर जास्त जोर दिला आहे. शिक्षण म्हणजे मनुष्याचा सर्वांगीण विकास होय. सामाजिक उन्नतीचे ते एक साधन आहे. अहिंसात्मक तत्वाला शिक्षणात विशेष स्थान दिले पाहिजे. शिक्षणाचा संबंध जीवनाशी असावा. प्राथमिक शिक्षण राज्यात नि:शुल्क व अनिवार्य असावे. प्राथमिक शिक्षण वयाच्या सातव्या वर्षापासून ते वयाच्या चौदाव्या वर्षापर्यंत देण्यात यावे. गांधीजींच्या शिक्षण योजना बुनियादी  शिक्षण योजना म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या पद्धतीत कृतीतून शिक्षण देण्यात येते.' करा व शिका' हे तत्व या पद्धतीत अंमलात आणण्यात येते. शिक्षण मातृभाषेतून दिले जावे. शिक्षण घेतल्यानंतर व्यक्ती स्वतःच्या पायावर उभी राहू शकते. या शिक्षणामुळे सुशिक्षित बेकारांची समस्या राहणार नाही. व्यक्तीला स्वावलंबी बनवणारे हे शिक्षण असायला पाहिजे. ब्रिटिशांनी सुरू केलेले शिक्षण हे केवळ नोकरीसाठी उपयोगी पडणारे होते. जीवनाशी ते सुसंगत नव्हते. शिक्षणाने व्यक्तीच्या जीवनाचा दृष्टिकोन व्यापक झाला पाहिजे.

## ४) वर्ण व्यवस्था व समाज व्यवस्था :

गांधीजींवर भारतीय संस्कृतीचा प्रभाव असल्यामुळे त्यांनी वर्णव्यवस्थेचे समर्थन केलेले आहे. गांधीजींनी वर्णव्यवस्थेचे समर्थन केलेले असले तरी सर्व वर्णांना समान दर्जा दिलेला आहे. वर्णाच्या आधारावर केल्या जाणाऱ्या भेदभावालाही विरोध केलेला आहे. व्यक्तीचा वर्ण हा

जन्मावर न ठरता गुणांवर ठरवावा यावर भर दिलेला आहे. त्यांनी व्यावहारीकतेच्या आधारावर वर्णव्यवस्थेचे समर्थन केलेले आहे. प्रत्येक वर्णाच्या व्यक्तीला वर्णानुसार परंपरागत व्यवसाय प्राप्त होतो. या व्यवसायाची माहिती व्यक्तीला कुटुंबात बालपणी मिळालेल्या औपचारिक शिक्षणातून प्राप्त होतात. त्यामुळे व्यवसायासाठी आवश्यक कौशल्य शिकविण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षण देण्याची आवश्यकता नसते. वर्णव्यवस्थेने प्रत्येक वर्णाला व्यवसायाचे वाटप केलेले असल्यामुळे रोजगार व आर्थिक असुरक्षिततेची समस्या देखील भेडसावत नाही . सर्व व्यवसायाचा समान दर्जा असल्यामुळे श्रेष्ठ कनिष्ठतेची भावना नष्ट होईल. सर्व व्यक्तींनी पारंपारिक व्यवसाय केल्यामुळे समाजाच्या सर्व गरजा पूर्ण होतील व समाज स्वयंपूर्ण बनेल. गांधींनी वर्णव्यवस्थेचे समर्थन केलेले असले तरी या वर्णात सहभागी असलेल्या लोकांनी आपण कोणत्याही एका वर्णाचे न मानता आपण एका समाजाचे घटक आहोत असे मानावे.

### ५) शारीरिक श्रमावर भर :

गांधी प्राचीन भारतीय वर्णव्यवस्थेला आदर्श मानतात, परंतु वर्णव्यवस्थेने केलेल्या असमान श्रमविभागणीला मान्यता देत नाही. वर्णव्यवस्थेत शारीरिक श्रमाची जबाबदारी विशिष्ट वर्गावर टाकल्यामुळे शारीरिक श्रमाला हीन लेखले गेले. शारीरिक श्रम करणारे कनिष्ठ दर्जाचे लोक असतात हा आभास निर्माण झाला. परिणामतः शारीरिक श्रमाचे महत्त्व कमी होऊन बौद्धिक श्रमाचे महत्त्व वाढले. गांधीजींच्या मते, "अन्नासाठी मानवाने श्रम केले पाहिजे हे ईश्वरी विधान आहे. गीतेत सांगितले आहे की, श्रमाशिवाय जो अन्न खातो, तो चोरीचे अन्न खातो". गांधींनी आपल्या वैयक्तिक जीवनात देखील शारीरिक श्रमाला महत्व दिले. दररोज एक तास सुतकताई करणे, संडास साफ करणे, बागबगीचा सफाई करणे, इ. कार्य गांधीजी करत असत. श्रमाच्या माध्यमातून श्रम प्रतिष्ठेचा विचार रुजविणे हा गांधीजींचा प्रयास होता.

### ६) राज्याचे कार्यक्षेत्र :

राज्याच्या वाढत्या कार्यक्षेत्रातून होणाऱ्या दुष्परिणामाची शक्यता लक्षात घेऊन गांधीजी ग्राम राज्यात राज्याचे कार्यक्षेत्र मर्यादित ठेवण्यावर भर देतात. राज्याच्या वाढत्या कार्यक्षेत्रामुळे व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येत असते. व्यक्ती राज्य नियंत्रणापासून जास्तीत जास्त मुक्त असणे स्वातंत्र्यासाठी आवश्यक असते. म्हणून राज्याला व्यक्तीच्या खाजगी जीवनात हस्तक्षेप करण्याचा अधिकार देऊ नये. राज्याने कायदा व सुव्यवस्था क्षेत्राकडे लक्ष द्यावे. गांधीजी राज्य नष्ट करावे या मताचे समर्थन करीत नाही, कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारी नष्ट करण्यासाठी राज्याची गरज राहील असे ते मानतात. गांधीजींनी न्यूनतम राज्याच्या संकल्पनेचे समर्थन केलेले आहे.

### ७) विरोध करण्याचा अधिकार :

गांधींजी राज्याला विरोध करण्याचा अधिकार देतात. राज्य जर जनतेच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करत नसेल तर जनतेने राज्याच्या कायद्यांचा विरोध करावा. अशावेळी राज्याचा विरोध करणे जनतेचा अधिकार नव्हे तर ते एक कर्तव्य ठरते. विरोध मात्र अहिंसात्मक मार्गानेच करण्यात यावा, यावर गांधीजींचा कटाक्ष आहे.

**८) संरक्षण व्यवस्था :**

संरक्षण ही मानवाची मूलभूत गरज असते. समाज व्यवस्थेत चांगले व वाईट या दोन्ही प्रवृत्तीचे माणसे असतात. समाजव्यवस्थेतील प्रत्येक व्यक्ती सद्गुणी असेलच असे नाही. सद्गुणी नसलेल्या व्यक्तीच्या कृतीवर नियंत्रण ठेवण्याची गरज असते. समाजव्यवस्थेला परकीय आक्रमणाचा धोका असतो, तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलाची आवश्यकता असते. पोलीस दलाच्या माध्यमातून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविता येते. ग्रामराज्यात प्रत्येक खेड्यात एक पोलीस दल निर्माण केली जाईल. प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीची पोलीस दलात नेमणूक केली जाईल. पोलीस दलाकडे गावाच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली जाईल. जनतेचे सेवक या नात्याने पोलिसांचे कार्य चालेल. गुन्हेगारांना शिक्षा मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्यांच्या हृदय परिवर्तनावर जास्त भर दिला जाईल.

**९) न्यायव्यवस्था ;**

ग्रामराज्यात न्याय हा स्वस्त असला पाहिजे आणि तो लवकरात लवकर मिळाला पाहिजे यावर भर दिला. न्यायाचा विलंब टाळण्यासाठी त्यांनी न्यायालयांची संख्या कमी करण्यावर भर दिला. न्यायदानाची कामे गावातील पंचमंडळी करतील. पंचांनी दिलेला निर्णय अंतिम असेल. वकिलांची फी कायद्यामार्फत ठरविली जाईल.

**१ ०) कारावास व्यवस्था :**

कारावासात बदल्याच्या भावनेने देण्यात येणारी शिक्षा गांधीजींना मान्य नव्हती. शिक्षेचा उद्देश गुन्हेगाराला सुधारण्याचा असावा, त्याची मानसिक स्थिती लक्षात घेऊन त्याच्यावर मानसोपचार करावेत. मानसोपचाराने त्याच्यातील दोष घालवावेत. गुन्हेगारांशी कठोर व्यवहार करण्यापेक्षा त्यांना योग्य मार्गदर्शन करावे. गुन्हेगाराला धंदेशिक्षण देण्यात यावे. कारावासातून तो बाहेर पडल्यानंतर एक स्वावलंबी व्यक्ती म्हणून तो जगू शकला पाहिजे. गांधीजी तुरुंगाचे रूपांतर सुधारणागृहात करू इच्छित होते.

अशा प्रकारे गांधीजींनी 'स्वयंपूर्ण खेड्याची' संकल्पना मांडून भारताच्या विकासासाठी रामराज्य, ग्रामराज्याची व्यापक संकल्पना मांडलेली आहे. गांधीजी मानतात की "भारतात ग्रामराज्याची स्थापना झाल्यास भारत हा देश पृथ्वीवरील स्वर्ग ठरेल किंवा भारतात पुन्हा रामराज्य अवतरण्यास वेळ लागणार नाही".

**आपली प्रगती तपासा :**

१ ) महात्मा गांधींच्या विचारांचे परीक्षण करा.

२) महात्मा गांधींचे सामाजिक विचार आदर्शवादावर आधारलेले आहेत याबद्दल तुमचे मत सांगा.

३) महात्मा गांधींच्या ग्रामराज्य,रामराज्य किंवा अहिंसात्मक राज्य संकल्पनेची आधुनिक काळातील उपयुक्तता विशद करा.

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ** :

१ ) डोळे, ना. य. (१ ९६९) राजकीय विचारांचा इतिहास, पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन

२) वराडकर र. घ. (२००४) भारतीय विचारवंत, नागपूर: विद्या प्रकाशन

३) नांदेडकर व. गो. (२०११) 'राजकीय विचार आणि विचारवंत', पुणे: डायमंड प्रकाशन

❉❉❉❉❉❉❉

# २

# राष्ट्रवाद

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ रवींद्रनाथ टागोर (१८६१ ते १९४१)

२.४ स्वा. विनायक दामोदर सावरकर (१८८३ ते १९६६)

२.५ विद्यापीठीय प्रश्न

२.६ संदर्भ ग्रंथ

## २.१ उद्दिष्टे

समकाळात जगातील विविध राष्ट्रांमध्ये राष्ट्रवादी चळवळींनी जोर धरला आहे. जुलूमी, अन्यायग्रस्त राजवटीतून मुक्तता मिळवण्यासाठी राष्ट्रातील जनता आपण एक आहोत या भावनेतून एकत्र येते. आणि एका विशिष्ट नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली संघटित होऊन अगर स्वयंस्फुर्तीने त्या राजवटीविरुद्ध लढा देते. गेल्या काही वर्षात अरब जगतातील इजिप्त, ट्युनिशिया, येमेने या देशातील राष्ट्रवादी चळवळींवरून हे लक्षात येते.

स्वातंत्र्यपूर्व भारतात देखील विविध राजकीय नेते, विचारप्रवाहांनी स्वातंत्र्यलढ्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. या विचारप्रवाहांपैकी राष्ट्रवाद हा एक विचारप्रवाह आहे. या विचारप्रवाहाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

१) रवींद्रनाथ टागोर यांच्या राष्ट्रवादाविषयक विचारांचा अभ्यास करणे

२) स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे राष्ट्रवाद विषयक विचार जाणून घेणे.

## २.२ प्रास्ताविक

राष्ट्रवाद ही राज्यशास्त्रातील एक अत्यंत महत्वाची संकल्पना आहे. राष्ट्रांमध्ये स्वतंत्र राज्यसंस्था स्थापन व्हावी, राष्ट्राचे संघठन सार्वभौम राज्यसंस्थेत व्हावे असा आग्रह धरणारी, राष्ट्रीय स्वत्वाची जाणीव राजकीय कृतीद्वारे व्यक्त करणारी विचारप्रणाली म्हणजे राष्ट्रवाद होय.

राष्ट्रवादासाठी समान भाषा, संस्कृती, भूप्रदेश याबरोबरच आपण एक आहोत व इतरांपेक्षा वेगळे आहोत, अशी जाणीव व्यक्त व्हायला पाहिजे. व त्यासाठी आपले स्वतंत्र सार्वभौम राज्य स्थापन करण्याची आकांक्षा निर्माण व्हावी लागते. वास्तविक पाहता राष्ट्रवादी चवळीचा उदय युरोपात झाला. ब्रिटीश राजवटीच्या काळात भारतामध्ये राष्ट्रवादी विचाराने मूळ धरले.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीला भारतातील विविध विचारवंतांच्या राष्ट्रवादी विचारांनी प्रेरणा दिली आहे. इतकेच नव्हे तर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा राष्ट्रवाद हा पाया मानला जातो. आधुनिक भारताच्या राजकीय विचारांच्या क्षेत्रात सावरकर, टागोर, सर सय्यद अहमद, पंडित जवाहरलाल नेहरू इ. नी राष्ट्रवादविषयक विचार मांडले आहे.

या प्रकरणात आपण स्वातंत्र्यवीर सावरकर आणि रवींद्रनाथ टागोर यांच्या राष्ट्रवाद विषयक विचार अभ्यासणार आहोत. या दोन्ही विचारवंतांनी आधुनिक भारताच्या राष्ट्रवादविषयक विचारात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. इतकेच नव्हे तर विविध क्रांतिकारकांना स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रेरणा देण्याचे कार्य त्यांच्या राष्ट्रवादी विचाराने केले आहे.

## २.३ रवींद्रनाथ टागोर.

प्राचीन भारतीय प्रज्ञेचे सारतत्त्वाच्या रुपात कालिदास, चंडीदास आणि तुलसिदास यांच्या परंपरेत एकाच व्यक्तीचे नाव घ्यावे लागते ते म्हणजे महाकवी रवींद्रनाथ टागोर यांचे. त्यांनी काव्य, नाट्य, संगीत, गद्यलेखन, धर्म, अध्यात्म समाजकारण, इतिहास, शिक्षण इ. क्षेत्रांबरोबरच राजकीय विचारांच्या क्षेत्रातही त्यांनी आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवला आहे. भारताच्या पुनर्जागरणाच्या इतिहासात रवींद्रयुगाचा ठसा उमटला आहे. भारताच्या राष्ट्रीय आंदोलनात प्रत्यक्ष जरी त्यांनी भाग घेतला नसला तरी भारतीय राष्ट्रीय नेत्यांना प्रेरणा देण्याचे त्यांचे कार्य महत्वाचे ठरते.

टागोर हे एक महान देशभक्त होते. तसेच ते सनातन परंपरेचे वारसदार होत. आधुनिक भारतातील राजकीय विचारांच्या क्षेत्रात त्यांच्या राजकीय विचारांनी मोलाची भर घातली आहे. आदर्श राज्यव्यवस्थेसंबंधी स्वप्नाळू वृत्तीचे चिंतन त्यांनी कधीही केले नसले तरी तत्कालीन सामाजिक- राजकीय घटनांचे पडसाद त्यांच्या लेखनावर पडलेलेआढळतात. त्यांच्या राजकीय विचारांची व्याप्ती प्रचंड मोठी आहे. राष्ट्रवादापासून आंतरराष्ट्रवादापर्यंत, व्यक्तिवादापासून साम्यवादापर्यंत ग्रामीण कल्याणापासून मानवतेच्या कल्याणापर्यंत अशा अनेक विषयांवर त्यांनी चर्चा केली आहे. आजही त्यांचे विचार आपल्याला प्रेरणादायी ठरतात.

टागोरांचे स्वातंत्र्यावर अपार प्रेम होते. स्वातंत्र्याच्या संकल्पनेतच त्यांनी स्वाधीनतेची कल्पना मांडली आहे. स्वाधीनतेला ते एक महान मूल्य मानतात. राष्ट्र कल्पनेच्या टागोर विरोधक होते. ब्रिटीश राजवटीवर देखील त्यांनी टिकाटिप्पणी करून या राजवटीच्या चांगल्या बाजूंवर प्रकाश टाकला आहे. मानवतेच्या आत्मिक कल्याणाची झालर त्यांच्या राजकीय विचारांना मिळालेली आहे. युद्ध, संघर्ष, स्पर्धा याऐवजी न्याय, नैतिकता, स्वातंत्र्य या मूल्यांना मानवमात्राने महत्वाचे मानावे, असे ते सांगतात. जगाच्या पाठीवरून साम्राज्यशाही, हुकूमशाही, क्रौर्य, रानटीपणा कायमचा नष्ट होऊन विवेक आणि सहृदयतेचे अधिराज्य संपूर्ण विश्वावर प्रस्थापित व्हावे, असे त्यांना वाटते.

भारताच्या स्वातंत्र्याविषयी त्यांनी विचार मांडले आहे. भारताच्या समस्या बहुमुखी असून, तिची सोडवणूक केवळ स्वातंत्र्याने होऊ शकणार नाही तर त्यासाठी सर्वांगीण प्रयत्नांची गरज आहे हे सत्य त्यांच्या समकालीन विचारकांपेक्षा टागोरांच्याच अधिक लक्षात आले. गांधीवादावरही त्यांनी टीका केली आहे.

अशा या महान व्यक्तिमत्वाचे वर्णन हिरेन मुकर्जी यांनी 'राजर्षी' हे विशेषण लावून केले आहे.

### २.३.१ राजकीय विचारांवरील प्रभाव-

१ ) तत्कालीन भारतातील सामाजिक-राजकीय परिस्थिती

२) ब्रिटीश राजवटीचा प्रभाव

३) कौटुंबिक प्रभाव

४) प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृतीचा प्रभाव

५) ब्राम्हो समाजाचे रुढीवादाविरुद्ध संघर्ष आंदोलन, बंगालातील साहित्यिक आंदोलन, राष्ट्रीय आंदोलन या तीन्ही आंदोलनांचा प्रभाव

### २.३.२ ग्रंथसंपदा –

टागोरांनी विपुल लेखन केले. २५ काव्य संग्रह, ५ कादंबऱ्या, १५ नाटके, ५ निबंध त्यांच्या नावावर आहे. त्यापैकी त्यांचे प्रसिद्ध पुस्तके म्हणजे-

१ ) गीतांजली (१९१३ चे नोबेल पारितोषिक प्राप्त)

२) साधना

३) आलोचक

### २.३.३ राष्ट्रवादाची संकल्पना / राष्ट्रकल्पना-

टागोरांच्या राष्ट्रवादविषयक विचार अभ्यासत असताना त्यांच्यी राष्ट्रकल्पना विचारात घ्यावी लागते. १९०१ च्या सुमारास टागोरानी 'राष्ट्र म्हणजे काय ?' आणि 'भारतीय सामाजिक व्यवस्था' हे दोन लेख लिहिले. त्यांनी राष्ट्र ही कल्पना जपान अमेरिकेत राष्ट्रवादावर भाषण करताना विस्तारित केली होती. ते राष्ट्रकल्पनेचे कट्टर विरोधक होते.

वास्तविक पाहता टागोर हे स्वतः कट्टर देशभक्त होते. ते सावरकरांप्रमाणे भारताला पूर्वजांची पवित्र भूमी व मातृभूमी समजत असत. त्यांच्या मते, राष्ट्रवादाचा सिद्धांत चेतनाशून्य औषधाप्रमाणे आहे. तो व्यक्तीच्या विचारशक्तीला सीमित करतो, बंधने घालतो. ते अशा अधम शक्तीचे दास बनवितात की, जे दूरच्या वसाहतींना लाभ कमावण्यासाठी उत्पादनाचे यंत्र बनविते. संघटित राष्ट्रवाद व्यक्तीच्या आध्यात्मिक चेतनेला विफल बनविते. इतकेच नव्हे तर त्याच्या आस्तित्वाचे शुभ उद्देश, स्नेह, नैतिक स्वातंत्र्य आणि आध्यात्मिक अनुरूपता इ. विषयी उदासीन बनवते. तसेच राष्ट्रवाद आधुनिक भांडवलशाही साम्राज्यवादी राज्यांची पुकार असून, ज्याचा उद्देश व्यक्तीची सूक्ष्म दृष्टी आणि चेतना समाप्त करणे हा आहे. राष्ट्रवाद शासन करणाऱ्या शक्तीद्वारा जन्म दिलेल्या युद्धात त्यांना विनाशकारी शस्त्राकरिता प्रवृत्त करून त्यांची बुद्धी बोथट करते.

टागोरांना राष्ट्रकल्पना मान्य नाही. ते राष्ट्रकल्पनेचे विरोधक होते. राष्ट्रत्व व पाश्चात्य संस्कृती यामध्ये त्यांनी फरक केला आहे. राष्ट्रत्वावर टीका करताना त्यांनी पाश्चात्य संस्कृतीवर टीका केली आहे. कारण युरोपियन पाश्चात्य राष्ट्रांनी आपल्या आर्थिक-भौतिक

प्रगतीसाठी 'राष्ट्र' या संघटनेचा उपयोग केला आहे. त्यामुळे अशा भौतिक संस्कृतीचे सर्व दोष राष्ट्रत्वासही आले. म्हणूनच पाश्चात्यांची राष्ट्रकल्पना भारतासाठी निरुपयोगी ठरते. टागोर म्हणतात, गेली ५० शतके भारत शांततेने राहत आहे. गेल्या ५० शतकात राष्ट्र हा शब्द आमच्या भाषेत कुठेच नाही इतकेच नव्हे तर त्याचे अस्तित्वसुद्धा आमच्या देशात आढळत नाही. राजकारण, राष्ट्रत्वापासून दूर राहून त्याची एकच इच्छा आहे, ती म्हणजे आत्मिक शक्तीचा परिचय करून देणे. चिरंतनत्वाच्या सहवासात खरा आनंद मिळवणे. युरोप राजकीय स्वातंत्र्याला महत्व देतो तर याउलट आम्ही आत्मिक स्वातंत्र्याला महत्व देतो. भारतात ब्रिटिश राजवटीपूर्वी अनेक राजवटींनी राज्य केले. परंतु ब्रिटीश राजवट ही या पूर्वीच्या राजवटींपेक्षा भिन्न आहे.

आपला इतिहास, मंदिरे, शेती, गुरुकुले, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कायदे, नितीनियम व त्यांची शांतिपूर्ण अंमलबजावणी इ. गोष्टींशी भारतीय लोकांचा संबंध होता. राज्यसत्तेशी त्यांना काहीच कर्तव्य नव्हते. आधीच्या राज्यकर्त्यांकडे भारताने केवळ एक मानव म्हणून पाहिले. त्यांचे धर्म, रूढी -परंपरा, रीतीरिवाजांशी भारतीयांची कधी नाळा जुळल्या तर कधी नाही. परंतु तेव्हा भारताचा संबंध राजाशी नव्हता तर राष्ट्राशी होता. भारत कधीही स्वतः राष्ट्र नव्हते. परिणामी ब्रिटीश राजवटीचे परिणाम अधिकच घातक होणार आहे.

टागोरांच्या मतानुसार, राष्ट्र म्हणजे शक्ती संघटन, पाशवी बळ व यांत्रिकी शक्ती होय. राष्ट्रामुळे माणसाला स्वतःच्या आत्मत्यागी, सर्जनशील स्वभावाचा, स्वरूपाचा विसर पड़तो राष्ट्र या यांत्रिक संघटनेमुळे मानवाच्या नैतिक प्रयोजन साध्य करण्यासाठी उपयुक्त शकणाऱ्या त्यागक्षमतेला तिच्या उद्दिष्टांपासून परावृत्त केले जाते. असे असूनसुद्धा माणसाला आपण भौतिक उद्दिष्टांची प्राप्ती करत असल्याचे वाटते. असे राष्ट्र मानवतेवरील संकट ठरते.. आपल्या शेजारील समाजाला भौतिक प्रगतीसाठी नामोहरम करते. समाज यांत्रिक संघटनाने बांधला जातो. मानव हा यंत्राचा एक भाग बनतो.

राष्ट्र या साधनाचा वापर करून स्वातंत्र्याबद्दल प्रेम वाटणारे सुद्धा जगावर गुलामगिरी लादण्याचा प्रयत्न करतात आणि असे करणे आपले कर्तव्य असल्याचे समजून सुख उपभोगतात. स्वभावतः न्यायी असणारी माणसे विचार- कृतींनी क्रौर्य करून अन्यायी होतात. आपण जगाला न्याय मिळवून देत असल्याचे भासवतात. स्वार्थासाठी लोक अधिकारपात्र नसल्याचे सांगून हिरावून घेतात. म्हणून टागोराना राष्ट्र ही संकल्पना भयावह वाटते. राष्ट्रापेक्षा टागोरांना मानव, मानवता धर्म महत्वाचा. वाटतो. राष्ट्राकडून मानवातील शांततेचे तत्त्व चिरडले जाते.

टागोर यांच्या मतानुसार, पाश्चात्यानी राष्ट्र या विकृत संकल्पनेची निर्मिती केली असून, विज्ञान आणि स्वार्थ या शक्तींमधून ती सिद्ध होते. मानवतेला तुडवून, सामाजिक आदर्शाना सोडून लोकांचे आर्थिक शोषण करून राष्ट्र कल्पना जगावर लादली जात आहे. सत्ता आली प्रगतीच्या नावाखाली, राष्ट्रे आपले खरे स्वरूप लपविण्याचा प्रयत्न करीत आहे.

टागोर म्हणतात, आधुनिक राष्ट्रनीतीची प्रेरणा संपत्तीचा लोभ आहे. राजगौरवाशी प्रजेचा जसा एक मानवी संबंध असतो तसा धनलोभाशी असू शकत नाही. संपत्ती निर्व्यक्तिक कोणाविषयी माया नसणारी असते त्यामुळे राष्ट्रे ज्या देशावर राज्य करतात. त्या देशातील नागरिकांविषयी आस्था वाटत नाही. राष्ट्रांना फक्त त्या देशातील सत्ता, संपत्तीच हवी असते.

संपत्ती व सत्तेसाठी राष्ट्र संघटित होऊन स्वार्थ ठेवून संबंध जोडते. तेव्हा त्याचे परिणाम नैतिकदृष्ट्या भयंकर स्वरुपाचे असतात. इतकेच नव्हे तर परकीय राजवट शासितांना नेहमीच कमी लेखत असते.

पाश्चात्य राष्ट्रवादाचा आत्मा सत्ताविस्ताराचा आहे. तो आध्यात्मिक आदर्शवादाचा नाही. या राष्ट्रवादाचा आधार संघर्ष आणि दुसऱ्यावर विजय मिळविण्याची महत्वाकांक्षा हा आहे. या राष्ट्रवादात सहकार्याला कोणतेच स्थान नाही, सहकार्याऐवजी ते साम्राज्यविस्तारासाठी स्पर्धा, संघर्ष करतात. परिणामी सत्तास्पर्धेसाठी संस्कृतीचा ओघ अडवून ठेवतात. राष्ट्रांच्या संघर्षातून जी संस्कृती उभी राहते तिच्यामध्ये मानवताधर्माला स्थान नाही. प्रत्येक राष्ट्र इतर राष्ट्राच्या गुप्त गोष्टी जाणून घेण्यासाठी वाईट मार्गाचा अवलंब करतात. प्रत्येक राष्ट्राचा इतिहास असत्याचा असल्यामुळे त्यातून आंतरराष्ट्रीय शांतीऐवजी राष्ट्राराष्ट्रांमध्ये संशय, मत्सर, अविश्वासाचे वातावरण निर्माण होते. राष्ट्रांचा स्वार्थ असलेल्या ठिकाणी राष्ट्रे सहकार्य करतात. थोडक्यात, पाश्चात्य राष्ट्रवाद सामाजिक सहयोग आणि आध्यात्मिक राष्ट्रवाद यांच्या कोणत्याही सिद्धांताचे समर्थन करीत नाही. ते केवळ सामाजिक संघठन आहे.

रवींद्रनाथ हे मानवतावादी विचारवंत होते. ते म्हणतात वैज्ञानिक संघठनातून कार्यक्षमता व सत्ता वाढू शकत नाही परंतु मानवता वाढू शकत नाही. राष्ट्र मानवतेला कोणत्याही प्रकारचे स्थान, महत्व देत नसल्यामुळे मानवतेमधील नीतीमत्ता लयास जाते. मानवी जाणिवा बोथट करणारे औषध म्हणून राष्ट्रकल्पनेचा वापर केला जातो. राज्यसत्तेकडून मानवतेला काळिमा फासली जाते. राष्ट्राच्या नावाखाली नैतिक नियमांचे उच्चाटन होत असते. त्याचे परिणाम राष्ट्रातील नागरिकांवर होत असतात. मानवी मूल्यांचा नागरिकांना विसर पडतो आणि तेव्हा राष्ट्राच्या अवनतीला सुरुवात होते. राष्ट्रकल्पनेचा हा वाईट परिणाम शासित राज्यातील नागरिकांबरोबर शासक राज्यातील नागरिकांवरही होत असतो. टगोरांचा विरोध विशुद्ध राष्ट्रकल्पनेला नसून तिच्या विकृत आणि संहारक आविष्काराला आहे. वांशिक तिरस्कार, संकुचित राष्ट्रनिष्ठा, आक्रमक राष्ट्रवाद, असत्य राष्ट्रभक्तीवर टागोर टीका करतात.

टागोरांच्या राष्ट्रवादावर टीकाकार आक्षेप घेतात. काही टीकाकारांच्या मते, टागोरांना राष्ट्रवादाचे तत्वज्ञान आणि समाजशास्त्राचे नीट आकलन होऊ शकलेले नाही. राष्ट्रवाद हा नेहमी साम्राज्यशाही व लोभीपणाशी, संघटीत अधाशीपणाशी निगडित असतो, असे नाही. टागोरांनी राष्ट्रवादाचा विचार भावनेच्या भरात केल्यामुळे त्याच्या चांगल्या बाजूचा त्यांना विसर पडला आहे. कारण त्यांची प्रतिमा संहारक राष्ट्रवादामुळे विचलित झाली होती.

वास्तविक पाहता, राष्ट्रवादाने माणसाला, जुलूम, अन्याय-अत्याचार, सरंजामशाही इ. च्या साखळ्यांमधून मुक्त केले. निरंकुश साम्राज्यशाहीचा अस्त झाला. त्याचप्रमाणे तो भावनिक उदात्तीकरणाचा एक मूलस्त्रोत ठरू शकतो. माणसा-माणसात जात-जमात, प्रदेशवादाच्या संकुचित मर्यादा ओलांडण्याची क्षमता निर्माण करू शकतो. राष्ट्राराष्ट्रात विविधता नसेल तर विकासाच्या भिन्न दिशांशिवाय विश्वबंधुत्व, आंतरराष्ट्रीय सहजीवनाची कल्पना प्रत्यक्षात कधीही उतरु शकणार नाही. म्हणूनच राष्ट्रवाद हा विश्व एकात्मतेच्या वाटचालीतील एक महत्वपूर्ण आणि अनिवार्य असा टप्पा आहे. राष्ट्रवाद असेल तरच आंतरराष्ट्रीयत्वाची भावना रुजु शकते. नाहीतर ती एक अमूर्त संकल्पना ठरते. या गोष्टीकडे टागोर दुर्लक्ष करतात.

थोडक्यात, क्रूर पाशवी, अत्याचारी, यांत्रिक असे एकांगी राष्ट्रवादाचे चित्रण ते रेखाटतात. व त्याला विरोध करतात. मानवतावादी विचाराचा पुरस्कार करणारे टागोर भारताने अशा राष्ट्रवादाचा अंगीकार करू नये, असे स्पष्ट म्हणतात.

प्रश्नावली – टागोरांची राष्ट्रकल्पनेविषयक विचार स्पष्ट करा

### २.३.४. ब्रिटीश शासनाबद्दलची मते किंवा परकीय राजवटी विषयीचे विचार-

टागोर हे कट्टर देशभक्त असल्याने ब्रिटीश राजवटीविषयी त्यांच्या मनात प्रचंड चीड होती. ब्रिटीश राजवटीवर त्यांनी अत्यंत परखड शब्दात टीका केली आहे. ते असे म्हणतात की, भारतावरील परकीय राजवट हीच पाश्चात्य संस्कृतीच्या मूलतत्त्वांना आड येणारी आहे. जपानसंबंधी ते सांगतात की, जपानने पूर्णतः पाश्चात्य संस्कृती आत्मसात केली, परंतु त्याने पाश्चात्य राष्ट्रांच्या वर्चस्वाला विरोध केला. भारतीय ते करू शकलेले नाही. पाश्चात्य संस्कृतीचा आत्मा आणि पश्चिमी राष्ट्रे यामधील फरक भारतीयांना समजलेला नाही. पाश्चात्य शिक्षण, कायदा व सुव्यवस्था, प्रशासनाची पोलादी चौकट अशा अनेक गोष्टी या परकीय राजवटीने भारताला दिल्या. परंतु शिक्षणापेक्षा, या राजवटीने लष्करी संघटना, प्रशिक्षण, फौजदारी कार्यालये पोलिसी व्यवस्था, गुप्त चौकशी खाते याकडे जास्त लक्ष पुरवले. कायदा-सुव्यवस्था समाजात टिकवण्यासाठी यंत्रणांचे जाळे उभे केले. यामध्ये जनहित असले तरी त्याचे स्वरूप नकारात्मक आहे. परंतु त्या अंतर्गत राष्ट्राचा प्राण असलेल्या विकासाकडे लक्ष देणे राज्यकर्त्यांना जमत नाही. जनतेच्या आत्मविकासासाठी तिला संधी देणे राज्यकर्त्यांना सूचत नाही. खरे तर प्रशासनामध्ये राष्ट्राच्या विकास साधण्याची ताकद असते. परंतु ते भारताला समृद्ध करू शकत नाही. समाजात शांतता नांदणे महत्वाचे असते पण शांततेपेक्षा मानवी जीवन मोलाचे असते हे राज्यकर्त्यांना समजत नाही.

पाश्चिमात्य राष्ट्रांच्या सिद्धांत व व्यवहारकृतीत विरोधाभास आहे. ते स्वातंत्र्याचा उदोउदो करतात परंतु परतंत्र देशातील नागरिकांचे ते शोषण करतात. त्यांना स्वातंत्र्य बहाल करीत नाही. भारत देश या परकीय राजवटीच्या जाळ्यात पूर्णपणे अडकलेला आहे. भारतातील परकीय राजवट चांगली असली तरी या राजवटीत मानवतेला कोणतेही स्थान नाही. ब्रिटीश राज्यकर्त्यांचे भारतीयांशी केवळ राजकीय संबंध जोडले गेले आहे. वास्तवतः व्यक्तिगत जिव्हाळ्याचे संबंध कधीही जोडले जाऊ शकत नाही. ज्या देशातील नागरिकांवर आपण राज्य करतो तीदेखील माणसे आहे, याची जाणीव ब्रिटीशांना नाही. भारतीयांबद्दल त्यांच्या मनात फक्त मत्सराची भावना, उपेक्षा आहे. म्हणून हे राज्य माणसांचे नसून, पाशवी राष्ट्रांचे आहे, असे टागोर म्हणतात.

इंग्लंडच्या राणीने भारतात दरबार भरवला तेव्हाही टागोरांनी आपले विचार मांडले. टागोर म्हणतात दरबार भरवणे ही गोष्ट पौर्वात्य संस्कृतीतील आहे. पाश्चात्य राष्ट्रे जेव्हा दरबार भरवतात तेव्हा या संज्ञेचा नेमका अर्थ त्यांना समजलेला नसतो. दरबार भरवणे म्हणजे शास्ते आणि शासित या दोन्ही पक्षांनी आपापसातील आत्मीक - आंतरीक संबंध स्वीकारणे होय. हे संबंध केवळ बळाच्या जोरावर प्रस्थापीत झालेले नसतात तर ते प्रेम, सहकार्यावर प्रस्थापित झालेले असतात. भारतात पूर्वी जे दरबार भरत असे तो सर्वासाठी खुला असे. याउलट राणीचा दरबार आहे. विशेष म्हणजे या दरबारासाठी येणारा खर्च भारताकडूनच केला जाणार आहे. राणी म्हणेल त्याला फक्त मान झुकवून होकार द्यायचा, असे स्वरूप या दरबाराचे आहे.

भारतात ब्रिटीश राजवटीने आपले पाय रोवले असले तरी ते आणि भारतीय यांच्यातील संबंधांना मानव-मानवातील संबंध म्हणता येणार नाही. त्यांच्याशी भारतीयांशी असलेले संबंध केवळ व्यावहारिक आणि यांत्रिक स्वरुपाचे आहे. मानवी संबंध प्रस्थापित न झाल्यामुळे भारतीयांच्या कल्याणासाठी झटणे राज्यकर्त्यांना शक्य होत नाही. टागोर म्हणतात की, ब्रिटीशांनी भारतात पाश्चात्य शिक्षणाच्या माध्यमातून बुद्धीप्रामान्यवादी, उदारमतवादी मूल्ये रोवली. परंतु ब्रिटीश भारतीयांना अत्यंत लहान, आपल्या प्रशासनाच्या सोयीसाठी शिक्षण देत आहे. तसेच ते विकासाची संधी नाकारत आहेत. पूर्व-पश्चिमी अहंगंडाची भावना भारतीयांमध्ये रुजवत असून, त्यांना भारत देशाचे रास्त आकलन कधीही होणार नाही, कारण भारताबद्दलची त्यांची भावना स्वार्थी, पक्षपातीपणाची आहे. त्याचप्रमाणे भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्यांची संख्या जर्मनी-फ्रांसच्या तुलनेत ब्रिटनमध्ये सर्वात कमी आहे. मुळातच भारत-ब्रिटन संबंध स्वार्थ, गर्वावर आधारित आहे.

पुढे टागोर असे म्हणतात की, ब्रिटिशांपूर्वी ज्या राजवटींनी भारतावर राज्य केले त्यांना अनेक सोयीसुविधा उपलब्ध नव्हत्या. ती शासने 'राष्ट्रे' नसल्यामुळे त्यांची देशावरील पकड घट्ट नव्हती. त्यामुळे सर्व लोक त्या राजवटीत मनाप्रमाणे जीवन जगू शकली. ब्रिटीश राजवटीत मात्र लोकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असून, अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. पूर्वीच्या राजवटीत कितीही अडथळे आले तरी व्यक्ती त्यांना सामर्थ्यानिशी तोंड देत होते. आज लोकांच्या शक्तीचा शक्तिपात झाला असल्यामुळे ते अडथळ्यांना तोंड देऊ शकत नाही.

ब्रिटीश राजवट निण्यार्क्तिक आहे. मुघल राजवटीत अनेक दोष असूनही त्यांनी लोकांशी सामाजिक संबंध प्रस्थापित केले होते. ब्रिटीश मात्र आपल्या वांशिक अहंकारापायी भारतीयांपासून दूर राहत आले आहे. टागोर ब्रिटीश राजवटीची तुलना वाफेवर चालणाऱ्या अमानवी यंत्राशी करतात. भारतातील पूर्वीचे राज्यकर्ते आणि ब्रिटीश राज्यकर्ते यांच्यातील फरक हातमाग आणि यंत्रमागातील फरकाप्रमाणे आहे. हातमागावरील कापडामध्ये मानवाच्या सजीव बोटांची कलाकुसर असते परंतु यंत्रमागातून निघणारे कापड चांगले असले तरी एकसुरी आणि निर्जीव असते.

**योगदान-**

टागोरांनी ब्रिटीश राजवटीवर टिका केली असली तरी त्यांनी या राजवटीच्या चांगल्या गोष्टींवरही प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात की, ब्रिटीशांनी भारतीयांची अनेक अनिष्ट प्रथा-परंपरा, रीतीरिवाज, राज्यकर्त्यांचे अन्याय-अत्याचारापासून सुटका केली. पाश्चात्य शिक्षणाची दारे भारतीयांसाठी खुली केली. कायद्याचे राज्य प्रस्थापित करून जनतेला कायद्याचे संरक्षण प्राप्त करून दिले. कायद्याचे अधिराज्य ही संकल्पना भारतात रूजवली. हक्क, स्वातंत्र्य, न्याय ह्या पाश्चात्य मूल्यांची ओख भारतीयांना झाली. भारतीय लोकांमध्ये बंधुभाव निर्माण करून विविधतेत एकता प्रस्थापित केली. परंतु त्यांच्या मते ही सर्व चांगली कार्य पश्चिमेच्या आत्म्याची आहे, पश्चिमी राष्ट्रांची नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१) ब्रिटीश राजवटी बद्दलच्या टागोरांच्या विचारांचे परीक्षण करा.

## २.३.५ स्वातंत्र्यविषयक विचार-

स्वातंत्र्याच्या कल्पनेला टागोरांच्या विचारविश्वात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. राजकीय विचाराला टागोरांची महत्वाची देणगी म्हणजे स्वातंत्र्याची कल्पना होय. त्यांची स्वातंत्र्यासंबंधीची धारणा इतर विचारवंतांपेक्षा वेगळी आहे. विशेष म्हणजे ती भारतीय इतिहास, परंपरा इ. शी सुसंगत आहे. काही विचारवंत स्वातंत्र्य म्हणजे निरंकुश अधिकार व राजकीय स्वातंत्र्य असे मानतात. परंतु टागोरांनी स्वातंत्र्याला त्यापेक्षा वेगळा आशय प्राप्त करून दिला. त्यांनी आध्यात्मिक स्वातंत्र्याला उच्च स्थान दिले. आध्यात्मिक स्वातंत्र्यालाच ते खरे स्वातंत्र्य मानत असे. या स्वातंत्र्यात ते चेतना, विचार आणि कार्य करण्याचे स्वातंत्र्य गृहीत धरतात.

भारताप्रमाणेच आशिया- आफ्रिकी राष्ट्रांनाही स्वातंत्र्य मिळायला पाहिजे, असे ते म्हणतात. भारतातील कित्येक समस्यांचा उलगडा स्वयंशासनानेच होऊ शकतो. टागोरांच्या मतानुसार, स्वातंत्र्य म्हणजे सर्व प्रकारच्या निर्बंधांपासून मुक्तता नसून, सर्व सामाजिक संबंधांचा आनंद पर्यवसायी सुसंवाद आहे. टागोरांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेला अनेक पैलू आहेत. प्रेम, पावित्र्य, सर्जनशीलतेच्या आधारावर त्यांनी स्वातंत्र्यकल्पना मांडली आहे. त्यांच्या मतानुसार, स्वातंत्र्य हे प्रत्येक मानवासाठी बहुमोल असले तरी इतरांच्या स्वातंत्र्यामुळे आपल्या स्वातंत्र्यावर मर्यादा, बंधने येत असली तरी ती स्वेच्छेने स्वीकारावी. नाईलाज म्हणून स्वीकारल्यास परस्परातील सामंजस्याची भावना नष्ट होईल. स्वातंत्र्यामध्ये एका बाजुला स्वतंत्र राहण्याची इच्छा असते तर दुसऱ्या बाजूला सर्वांशी सहकार्याने राहावे लागते. या दोन्ही गोष्टी परस्पराबरोबर कार्य करीत राहतात. जेव्हा स्वातंत्र्याचा प्रयत्न दुसऱ्यावर विजय होण्याच्या इर्षेने प्रेरित, आक्रमक होतो तेव्हां त्यांची वाटचाल विनाशाकडे होत असते असे. स्वातंत्र्य जास्तकाळ टिकू शकत नाही.

ज्या देशातील स्वातंत्र्य वरील स्वरुपाचे नसते तेथे ते फक्त नावापुरते असते. अशा देशातील नागरीक खऱ्या अर्थाने स्वतंत्र नसतात. त्यांना माहित नसलेल्या अशा उद्दिष्टांकडे बहुमताच्या हातून ढकलले जात असते. लोक आत्मिक-नैतिक स्वातंत्र्याचा आदर्श विसरल्यामुळे असे घडते. थोडक्यात, टागोर आत्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात. अशा स्वातंत्र्यावर लगेचच संकटे येऊ शकतात. कारण सत्य हे माणसाचे नैतिक मूल्य असून, त्याच्या मुक्तीचा मार्ग आत्मिकच असू शकतो. आधुनिकीकरण- यांत्रिकीकरणातून मानवाला खरे स्वातंत्र्य मिळू शकत नाही. थोडक्यात, आधुनिकीकरण- यांत्रिकीकरणाच्या नावाखाली माणसाचे मनुष्यत्व दाबणाऱ्या भौतिक यांत्रिक संस्कृतीला टागोर विरोध करतात.

टागोर पुढे सांगतात की, पाश्चात्य लोकांचे अनुकरण म्हणजे आधुनिकता होय, असे आपण मानतो. परंतु खरी आधुनिकता ही मनाच्या स्वाधीनतेत असते. तसेच ती विचार कृती स्वातंत्र्यात असते. ती विज्ञानात असते. परंतु विज्ञानाचा वापर चांगल्या कारणासाठी करावा, वाईट कारणासाठी नाही. विज्ञाननिष्ठ जीवन आकर्षक असले तरी ते परिपूर्ण नाही. यंत्राच्या मदतीने चालणारे कारखाने, त्या कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांना एक यंत्र बनवितात आणि त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतात.

टागोरांच्या मते, यंत्रयुगीन अमानवी शक्तीपासून मानवी स्वातंत्र्याला धोका आहे. झपाट्याने होणाऱ्या औद्योगीकरण, कारखानदारीने भारतीयांना परकीय राजवटीपेक्षा अत्यंत जाचक बंधनात बांधून टाकलेले आहे. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. ही सर्व बंधनांचे पाश लोकं तोडतील  तेव्हाच ती खऱ्या अर्थाने स्वतंत्र होतील.

सहानुभूतीपूर्ण सहयोग, करुणा, विश्वासावर आधारलेले मनोमीलन या सर्वांने मानवी जीवनाचा विकास होतो. आणि त्यांच्या परिणामस्वरूप व्यक्तीला स्वातंत्र्याचे वरदान प्राप्त होते.

**आपली प्रगती तपासा.**

टागोरांचे स्वातंत्र्यविषयक विचार इतर विचारवंतांपेक्षा वेगळे कसे ठरतात?

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

### २.३.६ भारताच्या स्वातंत्र्यविषयक विचार –

रवींद्रनाथ म्हणतात, भारत स्वातंत्र्यप्राप्तीचे जे प्रयत्न सुरू आहे. त्यामध्येत वरील मुद्दयांकडे दुर्लक्ष करूनच सुरु आहे. भारतीय पुढाऱ्यांनी स्वराज्याची स्पष्ट व्याख्या केलेली नाही. तसेच स्वाधीनतेची संकल्पना व्यापक अर्थाने समजून घेतलेली नाही. भारतात प्राचीन काळापासून प्रबळ जातिभेद असताना आपण स्वराज्याची स्थापना कशी करू शकतो, असा प्रश्न स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढणाऱ्यांना पडलेला दिसत नाही.

स्वित्झर्लण्डचे उदाहरण देऊन ते सांगतात की, स्वित्झर्लण्डमध्ये विविधता असूनही ते राष्ट्र झाले. त्यांचे म्हणणे बरोबर असले तरी ते एक गोष्ट विसरतात की, त्या देशात विविधतेला सांधणारे एकत्वाचे बंधही मजबूत आहे. त्या राष्ट्रात ऐक्याला महत्व दिले जाते. याउलट परिस्थिती भारतात आहे. भारतात केवळ विविधता आणि भेद आहे. ऐक्यधर्माचा अभाव असल्याने भाषा, धर्म, लोकाचार इ. विविध बाबतीत भेद पाहायला मिळतात. या भेदीय व्यवस्थेमुळे या विशाल, अखंड देशाचे लहान लहान तुकडे झाले आहे. जर आपल्याला खरे स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर सर्वप्रथम हे तुकडे जोडले पाहिजे. स्वातंत्र्याला महत्व देणारे व सामाजिक विषमतकडे दुर्लक्ष करणाऱ्यांकडून भारताला कधीच खरे स्वातंत्र्य दिले जाऊ

शकणार नाही. कारण त्यांच्यात आणि सर्वसामान्य लोकांमध्ये एक दरी निर्माण झालेली आहे. त्यांनी सतत सामान्य लोकांना आपल्यापासून दूर ठेवले आहे.

टागोर समाजनिष्ठ असल्यामुळे राज्यापेक्षा ते समाजाला अधिक महत्व देतात. भारत देश पूर्वीपासून समाजनिष्ठ असल्याचा त्यांना अभिमान वाटतो. 'मनुष्य हा समाजशील प्राणी आहे', हे ॲरिस्टॉटलचे विधान त्यांना मान्य आहे. मनुष्याला ते यांत्रिक प्राणी समजत नाही. भारताचा इतिहास हा विविध वाशिक- सामाजिक गटांचा इतिहास आहे. विविध राजवटींनी भारतावर अधिराज्य गाजवले. परंतु त्या भारतीयांना धर्मभ्रष्ट बनवू शकल्या नाही. भारतीय समाजव्यवस्थेत त्यांना बदल करता आला नाही,

टागोर पुढे म्हणतात की, भारतात सरकार ही नेहमीच एक बाह्य वस्तु राहिली आहे. उलट पाश्चिमात्य देशात सर्व गरजांच्या पूर्ततेसाठी शासनावर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती आढळते. अशी प्रवृत्ती भारतीयांमध्ये निर्माण झाल्यास भारत कधीच स्वाधीन होऊ शकणार नाही. माणसाला हक्क कधीही मागून मिळत नाही तर स्वत: साठी त्याची निर्मिती करावी लागते. कारण मानव हा प्रामुख्याने अंतरातला आतला जीव आहे. या अंतः सृष्टीतच त्याचे कर्तेपण असल्याने स्वाधीनतेच्या प्राप्तीसाठी आत्मशक्तीच्या द्वारे आतून देशाची निर्मिती केली पाहिजे. म्हणून ब्रिटीशांनी स्वातंत्र्य द्यावे ही अपेक्षा भारतीयांनी धरणे चुकीची ठरते. कारण असे दिलेले स्वतंत्र्य कधीच टिकू शकत नाही. ते काही काळातच नाश पावते. भारतासारख्या समाजप्रधान देशात स्वाधीनतेची उभारणी नवीन सामाजिक पुनर्रचनेतूनच होऊ शकते. विषमता नष्ट झाल्याशिवाय भारत खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकत नाही.

जातीयतेसंबंधीही टागोरांनी कोरडे ओढले आहे. ते म्हणतात, जातीयतेमुळे समाज निष्क्रिय - सांप्रदायिक बनतो. राजकीय स्वातंत्र्य उपभोगण्याची क्षमता अशा समाजाच्या अंगी नसते. जातीयता ही माणसाला माणसापासून दूर नेते. जातीयतेमुळे समाजाला एक ताठर, अपरिवर्तनीय, जन्मनिष्ठ स्वरूप प्राप्त झाले असून, सामाजिक संबंध तणावपूर्ण बनले आहे. जातीयतेमुळे समाजातील कनिष्ठ वर्गाला प्रस्थापितांनी खितपत ठेवले आहे. या वर्गाची उपेक्षा करून कोणत्याच स्वातंत्र्याची प्राप्ती करता येणार नाही. अशी ही व्यवस्था नष्ट करायला पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्याच्या आड येणारी दुसरी समस्या म्हणजे हिंदू-मुस्लीम तेढ होय. अत्यंत साध्या कारणांवरून या दोन धर्मियांमध्ये दंगे होत असतात. त्यांच्यात प्रेम, शांती, सहकार्य प्रस्थापित झाले नाही तर दोघांचेही हक्क नियमित करून घ्यायला पाहिजे. नाहीतर समाजाला दुबळेपणा प्राप्त होईल. दोन्ही धर्मियांनी आपल्याभोवती धर्माची कुंपने घट्ट बांधून ठेवली आहे. दोन्ही धार्मिय स्वतःला धर्मप्रवण धर्मसंरक्षक समजत असल्यामुळे या समस्येची सोडवणूक करणे कठीण बनले आहे. यामुळे हिंदू- मुस्लिमांत ऐक्य प्रस्थापित होऊ शकले नाही.

टागोर म्हणतात की, राजकीय कारणांसाठी ऐक्य करण्यात येणार असेल तर या दोन्ही धार्मियांची परस्पराबद्दल संशय व अविश्वासाची भावना वाढत जाईल. हिंदूनी मुस्लिमांबद्दल कधीच आत्मीयता बाळगली नाही. हिंदूंना मुसलमान अपवित्र तर मुसलमानांना हिंदू काफीर वाटतात. म्हणूनच हिंदू- मुस्लिम समस्या सोडविण्यासाठी आंतरीक बळाची, आत्मीक शक्तीची आवश्यकता असते. दोन्ही धार्मियांमध्ये असलेली ही तेढ नष्ट व्हायला पाहिजे.

दोघांच्या सामाजिक शक्ती समान असल्या पाहिजे. या संघर्षाकडे दुर्लक्ष केले तर भारताला त्याचे विपरित परिणाम भोगावे लागतील.

विविध गटांच्या सुसंवादावर व हिंदू- मुस्लिमांतील भावात्माक सहयोगावर आधारित एकजिनसी समाजाची बांधणी ही स्वाधीनतेची प्राथमिक गरज आहे. ब्रिटीशाविरोधात समाजाचे ऐक्य निर्माण होणार असेल तर ते फायद्याचे होणार नाही. ब्रिटीश भारतातून जेव्हा जातील तेव्हा हे कृत्रिम ऐक्य नष्ट होईल. म्हणून देशाला कायम टिकणाऱ्या ऐक्याची गरज आहे. भारतीयांनी ब्रिटीशांकडे स्वातंत्र्याची मागणी करण्यापेक्षा समाजाची विस्कळीत झालेली घडी नीट बसवली पाहीजे, असे टागोर म्हणतात. तेव्हा त्यांच्या स्वातंत्र्याच्या मागणीला बळ प्राप्त होईल.

भारतीय समाज मध्ययुगीन रूढी-परंपरा, मानसिक अवस्थेतून बाहेर पडत नाही, विवेक बुद्धीप्रामाण्यावाद, शास्त्रीय दृष्टीकोनाचा स्वीकार करीत नाही तोपर्यंत स्वाधीनतेच्या दिशेने वाटचाल करू शकत नाही. दैवीशक्तीवर अवलंबून राहण्यापेक्षा आपल्या बुद्धीवर अवलंबून राहणाऱ्या समाजातच परस्पर सहकार्यातून माणसांच्या सामूहिक मनाची एक शक्ती प्रकट होऊ शकते. भारतात अशी शक्ती प्रकट होऊ शकत नाही. याचे कारण म्हणजे भारतातील शिक्षणव्यवस्था होय. ही शिक्षणव्यवस्था तरुणांमध्ये बुद्धीप्रामाण्य निर्माण करू शकत नाही. भारतीय तरुणवर्ग अनेक अनिष्ट रुढी-परंपरांना बळी पडला आहे. अशा परिस्थितीत समाजाला खरे स्वातंत्र्य मिळणार नाही.

आपली प्रगती तपासा-

१) भारताच्या स्वातंत्र्यविषयक टागोर यांनी मांडलेल्या विचारांची चर्चा करा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

### २.३.७ टागोरांच्या विचारांचे मूल्यमापन-

रवींद्रनाथ टागोर यांचे राजकीय विचार अनेक दृष्टींनी आगळेवेगळे ठरतात. टागोरांची प्रतिभा बहुमुखी, मौलिक समन्वयात्मक होती. ते एक महान देशभक्त होते. समाजसुधारणा, राष्ट्रीय एकता, सुदृढता हा त्यांचा ध्यास होता. राजकारणात त्यांनी सहभाग घेतलेला नसला तरी त्यांचे राजकीय विचार पाहिल्यानंतर ते राजकारणाचे चिकित्सक विश्लेषक असल्याचे जाणवते. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचाही त्यांचा सखोल अभ्यास होता. समाजात एकता, सामंजस्य, शांतता आणि सहकार्याचा उपदेश केला.

टागोरांच्या राजकीय विचारात तारतम्य आणि एकता आहे. त्यांचे विचार परिवर्तनशील वाटत असले तरी त्यात परस्परविसंगती व विरोधी नाही. इतिहासाचा हवाला देऊन त्यांनी आपले विचार मांडले आहे. टागोरांचे राजकीय विचार आध्यात्मिक मानवतावादाने प्रेरित झालेले होते. त्यांनी शक्तीची निर्भत्सना केली. राष्ट्रवादाचे खंडन करून बंधुभाव आणि सहयोगावर

आधारित समाजजीवनावर, राष्ट्रैक्यावर भर दिला. संघर्षग्रस्त जगाला रवींद्रनाथांनी आपल्या राजकीय विचारातून मानवताधर्माचा संदेश दिला.

टागोर राष्ट्रकल्पनेचे कट्टर विरोधक होते. राष्ट्रवादावर त्यांनी जहाल टीका केली आहे. राष्ट्र आणि राष्ट्रवादाचे अत्यंत एकांगी चित्रण त्यांनी केले आहे. राजकारणात टागोरांचा मार्ग नैतिक होता. परकीय राजवटी, वाशिक आक्रमणे, साम्राज्यविस्तारविषयक धोरणे यावर टागोरांनी परखड शब्दांत टीका केली आहे. त्यांनी नैतिक मूल्ये स्थापन करण्यावर भर दिला. त्यांचे स्पष्ट मत होते की, जेव्हा राष्ट्र अंतःकरणपूर्वक न्याय, शुद्धता, ऐक्याची भावना, स्वातंत्र्य या गुणांचे आचरण करेल तेव्हाच ते शक्तिशाली बनेल.

असे असले तरी राजकीय विचारांच्या क्षेत्रात त्यांच्या स्वातंत्र्याच्या विचाराने. मोलाची भर घातलेली आहे. त्यांचे राजकीय विचार आजही प्रेरणादायी ठरतात, हे निर्विवाद सत्य आहे.

## २.४. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

**प्रस्तावना-**

आधुनिक भारतातील राजकीय विचारांच्या इतिहासात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अत्यंत महत्वपूर्ण योगदान दिले आहे.. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात उगम पावलेल्या अनेक विचारप्रवाहांपैकी एक अत्यंत ठळक आणि महत्वाच्या विचारप्रवाहांचे सावरकर प्रतिनिधित्व करतात. साध्यविषयक साध्य, तात्विक भूमिका इ. अनेक बाबतीत सावरकर आधीच्या चिंतकांपेक्षा वेगळे उठून दिसतात. ते इतिहास, परंपरेचे भोक्ते असले तरी जीर्णोद्धवादी नव्हते. बुद्धिप्रामाण्यवादी असले तरी पाश्चिमात्यांच्या अनुकरणाच्या विरोधात होते. राष्ट्रवादाचे प्रवर्तक असूनही समाज सुधारणांचे पुरस्कर्ते होते, सशस्त्र बंडाचे पुरस्कर्ते असूनही स्वप्नरंजनवादी नव्हते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा राजकीय विचार जगाच्या इतिहासातील अनुभवावर आधारित होता. सशस्त्र बंडाशिवाय परकीय राज्य नष्ट होत नाही, अशी त्यांची धारणा होती. याच सिद्धांताच्या आधारावर त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. ही विचारसरणी सर्वसामान्य व्यावहारिक बुद्धीला विचार न करता ग्राह्य वाटणारी व तरुणांनी सहजगत्या स्वीकारावी, अशी आहे.

प्रामुख्याने सावरकरांचे राजकीय विचार स्वातंत्र्यप्राप्ती आणि हिंदू राष्ट्रवाद या दोन विषयाभोवती केंद्रित झाले आहेत. हिंदुत्वाची संकल्पना हा त्यांच्या राजकीय विचाराचा केंद्रबिंदू मानला जातो. याबरोबरच त्यांनी क्रांतीचे तत्वज्ञान, हिंदूचे सैनिकीकरण, लष्करी प्रशिक्षण, राष्ट्रैक्य, हिंदू- मुस्लिम संबंध या विषयांवर अत्यंत परखडपणे विचार मांडले आहे. हिंदुत्वाचा हिंदू धर्मापासून स्वतंत्र विचार त्यांनी केला तसेच धार्मिक विचासरणीला शह देण्याचा प्रयत्न केला.

सावरकर प्रत्येक प्रश्नाचा विचार इतिहासाच्या अंगाने करतात. इतिहासाकडे पाहण्याचा त्यांचा विशिष्ट दृष्टिकोन आहे. विशिष्ट तत्वज्ञानाशी कायम बांधीलकी चीका स्वीकारण्याऐवजी काळाशी सुसंगत विचारप्रणाली निवडण्याची लवचिकता त्यांच्या राजकीय विचारात आढळते. राजकीय विचारांच्या क्षेत्रात टिळक - चिपळूणकरांना गुरु मानणारे सावरकर

सामाजिक क्षेत्रात रानडे- आगरकरांना गुरुस्थानी मानतात. राजकीय सामाजिक क्षेत्राचा त्यांनी योग्य तऱ्हेने समन्वय घातला आहे. बुद्धीप्रामाण्याबरोबरच सावरकरांच्या विचारांना उपयुक्ततावाद, आणि प्रत्यक्षनिष्ठेचेही जोड मिळालेली आहे. यामुळेच ते हिंदुत्वनिष्ठ असूनही सुधारक वा धर्मनिरपेक्षतावादी होऊ शकले. थोडक्यात, सावरकर हे पूर्णत: ऐहिकवादी आणि विज्ञाननिष्ठ विचारवंत होते.

### २.४.१ राजकीय विचारावरील प्रभाव-

देशभक्तीचा वारसा सावरकरांना आपल्या टिळकभक्त वडिलांकडून मिळालेला आहे. त्यांच्या विचारांना प्राचीन भारतीय इतिहासानेही प्रभावित केले आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे यांच्या लेखनाने त्यांना प्रभावित केले. त्यांच्या विचारांवर व क्रांतिकार्यावर मॅझिनीचा प्रभाव लक्षणीय होता. मॅझिनीच्या आत्मचरित्राचे मराठीत त्यांनी भाषांतर केले. आंतरराष्ट्रीय प्रचार व आंतरराष्ट्रीय शक्तिप्रवाहांचा भारतीय स्वातंत्र्याच्या संदर्भात पहिला विचार सावरकरांनीच केलेला दिसतो.

### २.४.२. सावरकरांची ग्रंथसंपदा -

सावरकरांनी विपुल लेखन केले. आणि त्यातूनच आपले विचार मांडण्याचा प्रयत्न केला. सावरकरांची ग्रंथसंपदा खालील प्रमाणे-

१ ) १८५७ चे स्वातंत्र्य समर

२) हिंदुपदपादशाही

३) भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने

४) नेपाळी आंदोलनाचा इतिहास

५) जोसेफ मॅझिनीचे आत्मचरित्र

### २.४.३ सावरकरांचे राष्ट्रवादविषयक विचार:-

हिंदू राष्ट्रवादाची विचारसरणी तयार करण्यात सावरकरांचे योगदान सर्वात मोठे आहे. सावरकरांच्या राजकीय विचारांमध्ये मध्यवर्ती असलेली संकल्पना म्हणजे हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना होय. या संकल्पनेचा विचार करीत असताना राष्ट्रवाद, हिंदुत्व, हिंदू- मुस्लिम परस्परसंबंध या मुद्यांचा अभ्यास करावा लागतो.

राजकीय विचार आणि व्यवहारात सावरकर कट्टर राष्ट्रवादी होते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रवादाचेही ते समर्थन करतात: राष्ट्रवाद ही आजच्या काळातील वस्तुस्थिती आहे, विश्वबंधुत्व हे उद्याचे स्वप्न आहे या गोष्टीची त्यांना पुरेपुर जाणीव होती. जोपर्यंत विश्वातील राष्ट्रे हिंस्र, युद्धमनस्क व पाशवी आहेत तोपर्यंत आंतरराष्ट्रवादाचे स्वप्न पाहणे योग्य नाही, असे सावरकर मानीत असे.

हिंदू संस्कृती, धर्म, परंपरा इ. विषयी वाटणाऱ्या अभिमानातून सावरकरांचा राष्ट्रवादाचा विचार उदयास आला आहे. मातृभूमी म्हणजेच भारतभूमी आणि तिची परकीय दास्यातून

मुक्तता ही दोन्ही त्यांची बालपणापासून श्रद्धास्थाने बनली होती. त्यांची ही श्रद्धा त्यांच्या विविध काव्यकृतीतून व्यक्त होते. त्यांचा राष्ट्रवाद केवळ मातृभूमी म्हणजेच मायदेशाचा भूभाग एवढाच सीमित नव्हता तर कित्येक वर्षांची भारताला जी सांस्कृतिक परंपरा लाभली आहे त्या परंपरा, संस्कृती, वारशाचादेखील त्यांच्या राष्ट्रवादाला आधार होता. या परंपरेला ते 'हिंदुत्व' असे म्हणतात. या परंपरेचा सखोल अभ्यास करून ग्राह्य ते ठेवून व अग्राह्य ते सोडून जे शिल्लक राहते ते त्यांच्या राष्ट्रभावनेचा पाया होता तर इतिहास त्यांच्या राष्ट्रभावनेचा मूलस्त्रोत होता.

सावरकरांचा भारतीय राष्ट्रवादासंबंधीचा विचार हा राष्ट्रीय काँग्रेसच्या राष्ट्रवादी विचारापेक्षा फारच वेगळा आहे. राष्ट्रीय काँग्रेस राष्ट्रवादाकडे केवळ भौगोलिक अस्मिता म्हणून पाहत असे. केवळ समान प्रादेशिकता हा राष्ट्रवादाचा आधार असू शकत नाही. त्याला धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक बाजू असणे आवश्यक असते. भारतातील राष्ट्रवाद हा हिंदू राष्ट्रवाद आहे, त्याला भारतीय राष्ट्रवाद असे म्हणणे त्यांना योग्य वाटत नाही. त्यांच्या मते, भारतीय राष्ट्रवाद अस्तित्वात आला आहे, असे मानने परिस्थितीला धरून होणार नाही. भारतात राजकीय महत्वाकांक्षा जिवंत असलेला, भारतीय संस्कृतीशी समरस न झालेला, स्वतःचा वेगळेपणा टाकून न देता स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची घोषणा करणारा मुस्लिम समाज आणि हिंदू राष्ट्र यांच्यातील हा संघर्ष आहे. दोन वेगवेगळ्या राष्ट्रवादी भावनांचा हा संघर्ष आहे, असे सावरकरांना वाटते. एकराष्ट्र स्वरूपांत एकत्र राहण्याच्या समान भावने अभावी केवळ प्रादेशिकतेच्या पोकळ आधारावर उभे राहिलेले राज्य दीर्घकाळ टीकू शकत नाही, अशी त्यांची धारणा होती.

सावरकरांच्या राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा विचार करीत असताना हिंदू-मुस्लिम संबंध विषयक त्यांनी मांडलेल्या विवेचनाचा आढावा घ्यावा लागतो. सावरकरांच्या मते, हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी काँग्रेसने केलेले प्रयत्न तर्कशुद्ध नसल्यामुळे ते यशस्वी होऊ शकत नाही. मुसलमानांना धर्मवेडेपणा जोपासून हिंदू लोकांना सेक्युलर होण्यास सांगणे काँग्रेसला आधुनिकतेचे लक्षण वाटते. अशी टीका सावरकर करतात.

सावरकरांच्या मतानुसार, हिंदू- मुस्लिम समस्येचा तीन महत्वाच्या अंगांनी विचार करायला पाहिजे. ही तीन अंगे म्हणजेच-

१ ) सांस्कृतिक

२) सामाजिक

३) राजकीय

सांस्कृतिक

हिंदू-मुस्लीम संबंध

राजकीय

सामाजिक

सांस्कृतिकदृष्ट्या हिंदू-मुस्लीम समाजात अंतर आहे. धर्म-संस्कृतीचे अलगीकरण करू न शकल्यामुळे मुसलमानांना संस्कृतीय भारतीय होता आले नाही.

तसेच या दोन्ही समाजात असलेला सामाजिक दुरावा नष्ट झालेला नाही. त्यांच्यात संघर्ष झालेला नसला तरी एकजिनसीपणा त्यांच्यात आलेला नाही.

राजकीयदृष्ट्या देखील हिंदू लोक संख्याबळाच्या जोरावर अधिकार गाजवतील अशी भीती मुस्लिमांना वाटत आली आहे. पाश्चिमात्य विचारपरंपरा आणि संस्कारांमधून हिंदू समाजाचे जसे आधुनिकीकरण घडून आले तसे मुसलमान समाजाचे घडून आलेले नाही. राजकीयदृष्ट्या देखील प्रतिगामी भूमिका स्वीकारून धर्मराज्याच्या मध्ययुगीन संकल्पनेतून ते सुटू शकले नाही. या समाजाला भूमीचे फक्त दोनच प्रकार माहित असतात. एक म्हणजे मुस्लिमांची भूमी व दुसरी शत्रुंची भूमी. सुक्तासूक्त मार्गांनी दुसऱ्या प्रकारची भूमी पहिल्या प्रकारात आणणे हेच त्यांचे राजकीय ध्येय असते. मुसलमानांना सवलती व खास प्रतिनिधित्व देऊन काँग्रेसने अलगत्व जोपासले. त्यांच्यावर आधुनिकतेचे व धर्मनिरपेक्षतेचे संस्कार करण्याऐवजी त्यांची अलगत्व जोपासण्याचा प्रयत्न केला. यामुळे एकराष्ट्रत्वाची संकल्पना मागे पडली. त्यातली त्यात ब्रिटीश राजवटीने हिंदू- मुस्लीम समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न केले. परिणामी मुस्लिम नेतृत्वाने आपला हिंदूंपासून वेगळा विचार केला.

इतिहास आणि समाजशास्त्राचा आधार घेऊन सावरकर दाखवू पाहतात की, हिंदू-मुसलमान यांच्यात कधीच ऐक्य, सुसंवाद प्रस्थापित होऊ शकत नाही. त्यांच्या मतानुसार या देशात हिंदू आणि मुस्लीम ही दोन परस्परविरोधी राष्ट्रके आहेत, असे मानूनच येथे राष्ट्रबांधणीचा विचार केला जाऊ शकतो. त्या दोघांना घेऊन हा देश एकात्म होईल असे कधीही वाटत नाही. या दोघांमधील तेढ निर्माण होण्याचे मूळ शतकानुशतके चालत आलेल्या सांस्कृतिक-धार्मिक- राष्ट्रीय वैमनस्यात आहे. मान्य केल्याशिवाय त्या वर उपाय योजता येणार नाही.

### २.४.४. हिंदुत्वाची संकल्पना :

हिंदुत्वाची संकल्पना ही सावरकरांच्या राष्ट्रवादी विचाराचा पाया समजला जातो. या संकल्पनेचा विचार करताना त्यांनी हिंदू कोण हे स्पष्ट केले आहे. हिंदूधर्म व हिंदुत्वं या दोन भिन्न संकल्पना आहे. हिंदू धर्म हा हिदुत्वाचा एक घटक आहे. हिंदुत्वाची व्याख्या सावरकरांनी कोणत्याही धर्मग्रंथाच्या आधारे न करता प्रदेशतत्व, जातितत्व आणि संस्कृतितत्व या तीन आधारावर केली आहे.

हिंदू कोण? हे सांगताना ते म्हणतात की, “आसिंधुसिंधू भारतभूमी ही ज्याची पितृभू आपण पुण्यभू आहे तो हिंदु.” पितृभू म्हणजे प्राचीन काळापासून ज्या भूमीत परंपरेने आपले जातीय व राष्ट्रीय पूर्वजांचे वास्तव्य आहे, ती भूमि. आणि पुण्यभू म्हणजे पवित्र भूमि. या अर्थाने भारतभूमीत आपल्या धर्माचा संस्थापक, ऋषी अवतार प्रकटला, त्याने धर्मोपदेश केला आणि त्याच्या वास्तव्याने या भूमीला पुण्यत्व प्राप्त झाले ती पुण्यभू. या भूमीत राहणारा म्हणजे हिंदू होय.

थोडक्यात, हिंदुत्व या शब्दास सामाजिक-राजकीय- धार्मिक असे तिहेरी संबंध आहे. हिदुत्वाची संकल्पना हिंदू धर्मापेक्षा व्यापक करून त्यानी हिदुत्वाच्या संकल्पनेत जैन-बौद्ध-शीखांचा अंतर्भाव केला. त्यांची पितृभू ही संज्ञा राष्ट्रतत्व सूचित करणारी आहे. पण त्यांनी

संस्कृतितत्वावर विशेष भर दिला आहे. समान इतिहास- रुढी, परंपरा, वाङ्मय शास्त्रे इ.नी बनलेल्या हिंदू संस्कृतीचा वारसदार म्हणजे हिंदू होय. सावरकर संस्कृतीची कल्पना पुण्यभूशी जोडतात. आणि त्यातून धार्मिक पैलूचे प्राबल्य त्यांच्या हिंदूत्व कल्पनेत होते. धर्म हा संस्कृतीचा केवळ एक भाग आहे हे सावरकर विसरतात, धर्म हीच संस्कृती ते मानतात. क्रिश्चण, पारशी, मुस्लिमांना राष्ट्रवादाच्या कक्षेबाहेर ठेवणाऱ्या संकुचित राष्ट्रवादात त्याचे रूपांतर होते.

### २.४.५ हिंदू : एक राष्ट्र :-

हिदुत्वाची व्याख्या करून सावरकर हिंदू हे एक राष्ट्र असल्याचे प्रतिपादन करतात. सावरकरांच्या मते, राष्ट्र निर्माण होण्यासाठी तीन गोष्टी आवश्यक असतात. त्या म्हणजेच परंपरा, हितसंबंध, ध्येयवाद होय.

राष्ट्र

परंपरा हितसंबंध ध्येयवाद

परंपरा ही राष्ट्राला भूतकाळाशी जोडते. समान हितसंबंध त्याला वर्तमान विसरू देत नाही आणि ध्येयवाद त्याला भविष्यकाळात घेऊन जातो.

सावरकरांच्या मते, हिंदू राष्ट्रवाद या तीन कसोट्यावर उतरतो. सावरकरांनी हिंदू राष्ट्रवादाचे चार लक्षणे सांगितले आहे ते म्हणजेच

१) एक देश

२) संस्कृति

३) संस्कृत भाषा

४) समान इतिहास-परंपरा

अशा रीतीने या चार घटकांच्या आधारावर त्यांची राष्ट्रकल्पना उभी आहे. त्यांचा राष्ट्रवाद हा संकुचित राष्ट्रवाद नाही, जीर्णोद्धारवादी नाही. त्यांचा हिंदुराष्ट्रवाद ही काळाची गरज होती. त्यांची हिदुत्वाची कल्पना ही मुस्लिमांच्या फुटीर राजकारणाची प्रतिक्रिया होती. त्यांच्या विचारांचे समर्थन अनेक विचारवंत करीत असले तरी त्यांची पुण्यभू-मातृभूची संकल्पना कधीच समर्थनीय ठरवता येणार नाही. कारण पुण्यभूच्या निकषांवर काही धार्मिक गटांना राष्ट्रवादाच्या कक्षेतून वगळणारा हा राष्ट्रवाद म्हणजे जिनांच्या द्विराष्ट्रवादाचाच हिंदू आविष्कार आहे.

**सावरकरांच्या राष्ट्रवादावर अनेक टीका करण्यात येतात.**

१) काही टीकाकरांच्या मते सावरकरांचा राष्ट्रवाद हा जातीय व धर्मनिष्ठ आहे. १९३७ नंतर हिंदू महासभेच्या व्यासपीठावरून जे हिंदुत्वनिष्ठ राजकारण केले त्यामुळे अशी टीका केली जाते.

२) सावरकरांच्या राष्ट्रवादावरील दुसरी टीका म्हणजे की, सावरकरांनी भारत देशात द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार केला. वास्तविक पाहता जीना हे द्विराष्ट्रवादाचे पुरस्कर्ते असले तरी त्या अर्थाने सावरकर नव्हते. हिंदुस्थानातील मुसलमान हे वेगळे राष्ट्र आहे, असे जीना मानतात तर सावरकर त्यांना एक राष्ट्रक मानतात. थोडक्यात, त्या कधीही एकरूप न होणाऱ्या दोन संस्कृती होत्या. सावरकरांनी एक व्यक्ती - एक मताचा पुरस्कार केला. हिंदू लोकांसाठी विशेषाधिकारांची मागणी केली नाही. संयुक्त हिंदू राज्याचा पुरस्कार केला. त्यामुळे त्यांची तुलना जीनांशी करणे चुकीचे ठरते. राज्यांतर्गत राज्याऐवजी ते संयुक्त राष्ट्रीय राज्याचा पुरस्कार करतात. थोडक्यात, सावरकरांच्या राष्ट्रवादाला द्विराष्ट्रवाद म्हणता येणार नाही.

३) सावरकरांच्या राष्ट्रवादावरील तिसरा आक्षेप अधिक महत्वाचा व रास्त आहे. सावरकरांनी केलेल्या हिंदुत्वाच्या व्याख्येतच या आक्षेपाचे मूळ आहे. त्यांच्या व्याखेतील पुण्यभू हा शब्द निधर्मी हिंदूला लागू पडेल की नाही, असा प्रश्न पडतो. मातृभूमीवरील श्रद्धा म्हणजे पवित्र भावना असा त्या शब्दाचा भावार्थ असेल तर कोणात्याही देशभक्ताला ती व्याख्या लागू पडत नाही. सावरकरांनी मुस्लिमांना व क्रिश्चनांना हिंदुत्वाच्या व्याख्येतून वगळले आहे. कारण त्यांची पवित्र भूमी दुसरी आहे. ते जरी हिंदुस्थानचे नागरिक असले तरी धार्मिकतेच्या अंगाने हिंदुस्थान त्यांना पवित्र वाटत नाही. मात्र जैन, शीख, बौद्ध, इंचा हिंदुत्वात समावेश सावरकरांच्या व्याख्येनुसार होऊ शकतो. पण मुस्लीम, ज्यू, ख्रिस्तींचा कधीही होऊ शकत नाही. कारण भारत ही त्यांची पुण्यभू कधीच होऊ शकत नाही. आणि हे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाशी विसंगत आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) स्वा. सावरकर यांचा हिंदू राष्ट्रवादासंबंधीचा विचार स्पष्ट करा.

२) सावरकरांच्या मते, हिंदू कोण? ते स्पष्ट करा.

३) स्वा. सावरकरांनी हिंदुत्वाची व्याख्या कशी केली आहे ?

## २.५. विद्यापीठीय प्रश्न

१ ) स्वा. सावरकरांचे हिंदू राष्ट्रवादावरील विचारांचे परीक्षण करा.

२) रवींद्रनाथ टागोर राष्ट्रकल्पनेचे कट्टर विरोधक होते, भाष्य करा.

३) रवींद्रनाथ टागोर यांचे राष्ट्रवादविषयक विचार स्पष्ट करा.

## २.६. अधिक वाचनासाठी संदर्भ

१) भारतीय राजकीय विचारवंत - डॉ भा. ल. भोळे, पिंपळपुरे पब्लिकेशन, नागपूर

२) भारतीय राजकीय विचारवंत -वि.मा. बाचल, स.म.गोळवलकर, रघुनंदन वऱ्हाडकर. के. सागर प्रकाशन, पुणे

❈❈❈❈❈❈❈

# ३

# तर्कशुद्ध आणि मूलगामी सुधारणा

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.४ गोपाळ गणेश आगरकर

३.५ डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

## ३.१ उद्दिष्टे

" **तर्कशुद्ध आणि मुलगामी** " या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. आगरकरांनी तार्किक व बुद्धीला पटणाऱ्या विचारांचे केलेले समर्थन.

२. **बुद्धीप्रामाण्यवाद** आणि व्यक्ती वादावर दिलेला भर अभ्यासणे.

३. आगरकरांचा समाज सुधारणांकडे कल होता, त्यांचे समाज प्रबोधक म्हणून विचार समजून घेणे.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मूलगामी विचारांचे अध्ययन करणे.

५. डॉ.आंबेडकरांच्या तार्किक विचारांचा अभ्यास करणे.

६. अस्पृश्यता आणि जातीयता दूर करण्यासाठी समाज सुधारणा करणे गरजेचे आहे, त्यासाठी ग्रंथप्रामाण्य वादापेक्षा बुद्धीप्रामाण्यवाद गरजेचा आहे हे अभ्यासणे.

## ३.२ प्रास्ताविक

महाराष्ट्रातील विवेकवादी प्रबोधन परंपरेचे काही विचारवंतांनी समर्थन केले. आपल्या कार्यावरील निष्ठा न ढळू देता त्यांनी आपल्या विचार व कृतीद्वारे समाजापुढे आदर्श उभा केला. भौतिकता, ऐहिकता, बुद्धीप्रामाण्यवाद, उदारवाद आणि विवेकवादाच्या आधारावर अशा विचारवंतांनी आपल्या विचारांची मांडणी केली. धर्म व नीतीला महत्त्व न देता बुद्धीला जे पटेल तेच आचरणात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ईश्वर आणि धर्म संकल्पनेची आपल्या तर्कशुद्ध व मूलगामी विचारातून चिकित्सा केली. सुधारणावादाचा पाठपुरावा करून समाजातील जुन्या रूढी, परंपरांवर कठोर प्रहार केले. या समाज व्यवस्थेतील रूढी व परंपरेची चिकित्सा करून त्यातील अन्याय व विसंगती सर्व समाजाच्या समोर आणली. आपल्या सभोवताली घडणाऱ्या घडामोडींचे सूक्ष्म निरीक्षण केले. अशा सुधारकांपैकी आगरकर हे एक होते, तसेच भारतीय समाजव्यवस्थेतील दिन दलितांचा आवाज बुलंद

करणारे डॉ.आंबेडकर यांनी देखील तर्कशुद्ध व मूलगामी विचारांच्या माध्यमातून वंचित वर्गाला आत्मभान उपलब्ध करून दिले.

## ३.३ विषय विवेचन

लोकांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षण आणि प्रबोधनाची आवश्यकता असते. हिंदू धर्मातील विसंगतीवर अचूक बोट ठेवत विज्ञाननिष्ठा, बुद्धिवादाच्या माध्यमातून समाज सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न फारच कमी सुधारकांनी केला. समाज परिवर्तनाच्या आड येणाऱ्या रुढी, प्रथा, परंपरा आणि संस्थांची चिकित्सा करून नवीन नियम व संस्थान निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे काम गोपाल गणेश आगरकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. भारतीय समाजात गतिशीलता निर्माण करण्यासाठी अव्याहतपणे धडपड केली. हिंदू धर्माच्या बुडाशी असलेली गुलामी मानसिकता सर्वांच्या निदर्शनास आणून दिली. व्यक्तीवादाला भौतिक वाद आणि बुद्धिवादाची जोड देऊन वैचारिक लढा उभा केला. संपूर्ण समाजाची बुद्धीवादावर उभारणी करण्याचा प्रयास केला. स्त्री, शूद्र आणि अस्पृश्यांबाबतचा सनातन विचार समाजातून मुळासकट उखडून टाकण्याचा प्रयत्न केला. सोवळ्या-ओवळ्यासारख्यज्ञसामान्य प्रश्नांपासून ते जातीभेद व अस्पृश्यतेसारख्या गंभीर विषयांवर विचार मंथन केले.

## ३.४ गोपाल गणेश आगरकर (१८५६ - १८९५)

सामाजिक सुधारणा किंवा राजकीय सुधारणा या वादाच्या केंद्रस्थानी असलेले महाराष्ट्रातील प्रभावशाली व्यक्तिमत्व म्हणजे गोपाल गणेश आगरकर होय. त्यांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी कराड जवळील टेंभू गावात झाला. त्यांनी आयुष्यभर दुष्ट रुढी, सामाजिक अन्याय, आणि व्यक्तीच्या विकासात अडथळा आणणाऱ्या प्रथांच्या विरोधात लढा दिला. आपले आयुष्य समाज सुधारणेच्या कार्यासाठी वाहून घेतले. सामाजिक सुधारणांना वैचारिक बैठक मिळवून दिली. समाजसुधारणे बाबतच्या पुरोगामी विचारामुळे टिळकांसारख्या जिवलग मित्रासोबत वैचारिक वाद झाला. भौतिकता, ऐहाकिता, बुद्धिप्रामाण्यवाद आणि व्यक्तिवाद या आधुनिक तत्त्वांना प्रमाण मानून सुधारणेचा पाठपुरावा करणारे आगरकर हे महाराष्ट्रातील श्रेष्ठ समाजप्रबोधनकार होते. आगरकरांना महाराष्ट्रातील विवेकवादी प्रबोधन परंपरेचे आद्य पाईक मानले जाते. त्यांना अल्प आयुष्य मिळालेले असले तरी त्यांनी आपल्या कर्तृत्वाद्वारे आपले नाव इतिहासात अजरामर केले.

### तार्किक आणि मूलगामी विचार :-

आगरकरांचा पिंड हा मुख्यतः समाजसुधारकाचा होता. बुद्धीला पटणाऱ्या गोष्टी आचरणात आणणे हा त्यांचा स्वभाव धर्म होता. धर्म, देवता, परलोक, पुनर्जन्म यासारख्या कर्मठ व जुनाट संकल्पनांनी भारतीय समाजमनावर पकड बसविली होती. भारतीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी ही पकड ढिली करणे आवश्यक होते. देव आणि धर्म संकल्पना त्यांना मान्य नव्हत्या. आगरकर लिहितात की, "आकाशातून देव येथे कधी आले नाहीत व येथून ते परत कधी आकाशात गेलेले नाहीत. आम्हीच त्यांना येथंले येंथे निर्माण करतो, त्यांच्या गुणांचे पोवाडे गातो आणि पाहिजे तेव्हा त्यांना नाहीसे करतो." धर्म आणि ईश्वर या संकल्पना मानवनिर्मित असल्याचे आगरकर नमूद करतात.

आगरकरांनी इहवादी, बुद्धीवादी आणि विवेकवादी भूमिकेतून सामाजिक प्रश्नांची चिकित्सा केली. पाश्चिमात्य संस्कृतीचे सरसकट अंधानुकरण करण्याची भूमिका घेतली नाही. भारताच्या मूळ प्रकृतीला धक्का न लावता पाश्चिमात्य कल्पनांचा स्विकार केला. आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण करून समाजसुधारणा करण्यासाठी अनेक व्यवहारिक उपाययोजना सुचविल्या. जातीव्यवस्था, चातुर्वर्ण्य, अंधश्रद्धा व पाखंडीपणाला विरोध केला. केशवपण, स्त्रियांचे पेहराव, स्त्रियांचे दास्यत्व, बालविवाह, विधवा-विवाह इ. विषयांवर परखड विचार मांडले. संमतीवयाच्या विधेयकाचे स्वागत केले. श्रृंखला तोडून टाकण्यासाठी आगरकरांनी स्त्रियांच्या विवाहापासून ते पेहरावपर्यंतच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करून आपली मते व्यक्त केली. त्यांच्या मते, भारतीय समाजातील समस्यांचे मूळ अज्ञान होय. हे अज्ञान दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता विशद केली. जुन्या व अनिष्ट रूढी नष्ट करण्यासाठी आणि ग्रंथप्रामाण्याचे महत्त्व कमी करण्यासाठी त्यांनी लेखणीच्या माध्यमातून सनातनीवर कठोर प्रहार केला. लोकजागृती आणि प्रबोधनाच्या हेतूने सुधारक वर्तमानपत्रात निबंधलेखन केले. बुद्धिवाद हाच उद्याच्या सुखी मानवी जीवनाचा पाया मानला. "बाहेरची गुलामगिरी नको असेल तर अगोदर घरची गुलामगिरी नाहीशी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे" ही आगरकरांची शिकवण होती.

आगरकर हे भौतिकता, ऐहिकता, बुद्धीप्रामाण्यवाद, व्यक्तीस्वातंत्र्य या आधुनिक तत्त्वांना प्रमाण मानून जीवाच्या कराराने समाज सुधारणांचा पाठपुरावा करणारे समाजप्रबोधक होते. महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला विवेकाचे, बुद्धीप्रामाण्यांचे व व्यक्ती स्वातंत्र्याचे व व्यक्ती स्वातंत्र्याचे अधिष्ठान देऊन, परिवर्तनाचे विज्ञाननिष्ठ तत्वज्ञान निर्माण करण्याचे श्रेय आगरकरांकडे जाते. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला गती या काळामध्ये प्राप्त करून देण्याचे काम त्यांनी केले. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारून ग्रंथ प्रामाण्याला विरोध करत बुद्धीनिष्ठतेत रस धरणारे तत्कालीन सुधारकांमध्ये आपले विचार परखडपणे मांडणारे आगरकर उल्लेखनीय आहेत.

आगरकरांनी बुद्धीवादाचा आधार घेऊन सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. बुद्धीला पटेल तेच स्वीकारले पाहिजे, केवळ अंधानूकरण करून ग्रंथांमध्ये दिले आहे म्हणून ते स्वीकारणे अयोग्य ठरते. रुढी-प्रामाण्या ऐवजी वैज्ञानिक कार्यकारणभावांनी युक्त बुद्धीप्रामाण्यवाद रुजवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्त्री सुधारण्याचा पुरस्कार करताना स्त्रियांना देखील पुरुषांच्या बरोबरीने हक्क व अधिकार असले पाहिजेत हा विचार प्रभावीपणे त्यांनी मांडला. 'स्त्रियांनी जाकिटे घातली पाहिजेत' असे ते म्हणत. याचाच अर्थ पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना समाजामध्ये महत्त्वाचे स्थान द्यावे या विचारांचा त्यांनी पुरस्कार केला.

राजकीय स्वातंत्र्याआधी समाजसुधारणा महत्त्वाची आहे. बालविवाह, अस्पृश्यता यासारख्या समाजातील अनिष्ट रूढी आधि नष्ट केल्या पाहिजे अशा विचारांचे ते होते. समाज सुधारणा विरुद्ध राजकीय स्वातंत्र्य याच वादातून १ ८८७ च्या ऑक्टोबर मध्ये त्यांनी केसरीचे संपादकत्व सोडले. १ ८८८ साली त्यांनी ' सुधारक ' हे वृत्तपत्र सुरू केले. व्यक्तीस्वातंत्र्य, बुद्धिवाद, भौतिकता या मूल्यांचा प्रचार त्यांनी सुधारकांमधून केला. तसेच जातीव्यवस्था, चातुर्वर्ण्य, बालविवाह, ग्रंथप्रामाण्य- धर्मप्रामाण्य, केशवपण इत्यादी अन्यायकारक परंपरांना त्यांनी विरोध केला. अंधश्रद्धा पाखणीपणा यांच्यावर प्रहार केले.

आगरकर व्यक्तीवादाचे पुरस्कार होते. बुद्धीला जी गोष्ट पटेल ते बोलणे व शक्य तितकी आचरणात आणणे मग त्याला इतरत्र पूज्य ग्रंथात व लोकरूढीत आधार असो वां नसो हे आगरकरांचे महत्त्वाचे तत्व होते . राजकीय व सामाजिक बाबतीत समता, संमती व स्वातंत्र्य हे घटक महत्त्वाचे आहेत. मनुष्यनिर्मित विषमता शक्य तितकी कमी असावी. सर्वांना सारखे निदान होईल तितके सारखे सुख मिळवण्याची व्यवस्था होत जाणे म्हणजे सुधारक होत जाणे अशी त्यांची सुटसुटीत विचारसरणी होती. 'विचारकलह हा समाजस्वास्थ्याला आवश्यक आहे' असे त्यांचे मत होते. त्यांच्या या विचारसरणीमुळे त्यांना टोकाचा विरोध झाला. सनातनी लोकांनी त्यांच्या जिवंतपणीच त्यांची प्रतीकात्मक प्रेतयात्रा काढली होती. पण तरीही निग्रहाने आणि निश्चयाने त्यांनी आपल्या विचारांचा पाठपुरावा केला.

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात सामाजिक जागृतीत आगरकर यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी समाज प्रबोधन करण्यासाठी सुधारक, केसरी व मराठा या वृत्तपत्राचा आधार घेतला. सामाजिक समता, स्त्री पुरुष समानता, आणि विज्ञाननिष्ठा ही त्यांची जीवनमूल्ये होती. मुलींनासुद्धा शिक्षण मिळायला पाहिजे असा लेख त्यांनी सुधारक या वृत्तपत्रात लिहिला.

बुद्धीप्रामाण्यवादाचा पुरस्कार करून महाराष्ट्रामध्ये समाज सुधारणा घडवून आणणे या उद्देशाने समाज सुधारणा करणारे आगरकर होय. समाज सुधारकांच्या मांदियाळीतील क्रांतिकारी समाज सुधारक म्हणून आगरकर हे महत्त्वपूर्ण ठरतात.

**आपली प्रगती तपासा :**

१ ) आगरकरांचे स्त्री स्वातंत्र्य व धार्मिक रूढी बद्दलचे विचार स्पष्ट करा.

____________________
____________________
____________________
____________________

२) आगरकरांचे विचार व कार्यांचे मूल्यमापन करा.

____________________
____________________
____________________
____________________

३) आगरकरांचे समाज सुधारणे बाबतचे विचार स्पष्ट करा.

____________________
____________________
____________________
____________________

## ३.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१ -१९५६)

आधुनिक भारताची जडणघडण ज्या श्रेष्ठ पुरुषांच्या कर्तुत्वाने झाली, त्यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रमुख आहेत. दलितांच्या उद्धारासाठी त्यांनी न्याय, हक्क मिळवून देण्यासाठी,त्यांची अस्मिता जागृत करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण जीवन वेचले. ते दलितांचे नेते होते त्याचबरोबर मानवतेचे पुजारी होते. संघर्षमय परिस्थितीतून वाटचाल करत त्यांनी सामाजिक क्रांतीची मशाल तेवत ठेवली.भारतीय समाज व्यवस्थेत आढळणाऱ्या समस्यांचा शास्त्रशुद्धपणे अभ्यास करून त्यांनी आपल्या व्यासंगी वृत्तीचा परिचय करून दिला.त्यांनी आपले संपूर्ण जीवन हिंदू धर्मातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आणि त्यांना अधिकार मिळवून देण्यासाठी खर्च केले. न्यायाधीष्टीत समाज रचना स्थापन करण्याचे ध्येय ठेवून सातत्याने संघर्ष करत राहिले. भारताच्या सर्वांगीण उत्थानात त्यांनी अफाट योगदान दिले.

स्वराज्य, लोकशाही, मूलभूत हक्क, अल्पसंख्यांकांचे हितरक्षण, समाजवाद, साम्यवाद, बौद्ध धर्म इ. संबंधी विचार त्यांनी मांडले. राज्यघटनेच्या जडणघडणीमध्ये केंद्रभूत कामगिरी करून ते संविधानाचे शिल्पकार ठरले. त्यांनी स्त्रियांच्या, कामगारांच्या कल्याणासाठी ज्या प्रकारची कामगिरी बजावली ती आजपर्यंतच्या कुठल्याही स्त्री, कामगार नेत्यांपेक्षा श्रेष्ठ ठरली. देशाची प्रारंभीची बांधणी होत असताना रिझर्व बँकेची स्थापना, चलन निर्मिती, विज, धरणे, जलसिंचन इ. क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य पायाभूत ठरले.

हे सारे होत असले तरी त्यांनी केलेले मूलगामी स्वरूपाचे कार्य म्हणजे भारतीय परंपरेची,धर्माची आणि संस्कृतीची केलेली तर्कशुद्ध चिकित्सा होय.

**डॉ. आंबेडकरांचे मूलगामी व तार्किक स्वरूपाचे विचार :**

भारतीय परंपरेलाच हिंदू परंपरा म्हणण्याची प्रथा आहे. या परंपरेची केवळ चिकित्सा करून ते थांबले नाहीत तर त्यातून नेमका काय बोध घ्यायचा आहे त्यांनी दाखवून दिले. हे कार्य फक्त वैचारिक व व्यासंग पूर्ण नाही तर ते उच्च प्रतीच्या मनोधैर्याचे लक्षण सिद्ध करणारे आहे.

कुठल्याही धार्मिक सांस्कृतिक क्रांतीला जन्म देण्यासाठी नेतृत्वापाशी विचार व्यासंग आणि मनाचा कणखर करारीपणा लागतो. हा करारीपणा डॉ.आंबेडकरांकडे होता. म्हणून त्यांनी फक्त विचार न मांडता परिवर्तनावर भर दिला. विचार मांडणारा माणूस फार फार तर विचारवंत होतो, परिवर्तनाचा जनक होत नाही. बाबासाहेब परिवर्तनकार ठरले. कारण परिवर्तनासाठी लागणारा दृढ निश्चयीबाणा त्यांनी प्रतिकूल प्रसंगीही दाखवला.

भारतीय परंपरा ही वैविध्यशाली आणि बर्हिमुखी आहे. तिच्यात चांगले आहे तसे वाईटही आहे. काही इष्ट आहे तसे अनिष्टही पुष्कळ आहे, असे असतानाही सर्वच्या सर्व संस्कृती आदरणीय कशी ठरेल, असा प्रश्न डॉ. आंबेडकर विचारतात आणि या संस्कृतीत विधायक काय आणि टाकाऊ काय, यावर झगझगीत प्रकाशझोत टाकतात. ते जे विचार मंथन करतात त्यातून या संस्कृतीचे जे सर्वोत्तम ते अलगदपणे समोर येते आणि बाबासाहेब ते निःसंकोचपणे स्वीकारतात. उत्तमातले सर्वोत्तम शोधण्याची आणि स्वीकारण्याची ही भूमिका निश्चितच अनुकरणीय आहे. ही भूमिका भूतकाळाचे ओझे अनावश्यक पणे डोक्यावर वागवत बसणार नाही असा विचार त्यांनी मांडला. परंपरेचे भान असणे म्हणजे परंपरा जशीच्या तशी स्वीकारणे

नव्हे. तर त्यांच्या मते सारासार विवेकाने आपल्या सदसदविवेकबुद्धीने परंपरेचा नेमका ठाव घेणे म्हणजे परंपरेचे भान जपने होय.

डॉ. आंबेडकरांच्या काळात भारतात चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता, सरंजामशाही या वाईट रितींचे अधिराज्य होते. दलित, आदिवासी, भटके विमुक्त हे सर्वच हालाखी, अन्याय, अस्पृश्यता, दास्य, अज्ञान यात खीतपत पडले होते. हा सर्व समाज जणू गलीतात्र झाला होता. डॉ.आंबेडकरांनी आपल्या तेजस्वी विचारांनी या समाजाच्या प्राणामध्ये फुंकर घालून चेतना आणली. त्यांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अन्यायाचा प्रतिकार व न्यायाच्या हक्कासाठी संघर्ष करण्यास जागृत केले. 'अस्पृश्य' हे देखील याच देशाचे नागरिक आहेत.व या देशावर इतर कोणाही नागरिका इतकाच त्यांचाही अधिकार आहे अशी भीमगर्जना त्यांनी केली.

**अल्पसंख्यांकांच्या हिताचे रक्षण :**

अल्पसंख्यांकांच्या हिताचे रक्षण करणे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व कार्याचा केंद्रबिंदू होता. भारतीय समाज जीवनात अल्पसंख्यांक लोकांवर होणारे अन्याय लक्षात घेऊन डॉ.आंबेडकरांनी सुरुवातीपासूनच अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण झाले पाहिजे असा विचार मांडला व त्यासाठी सतत प्रयत्न केले.

इ. स. १९३१- ३२ मध्ये झालेल्या गोलमेज परिषदेतही डॉ.आंबेडकरांनी अल्पसंख्याकांच्या रक्षणाचीच भूमिका घेतली होती आणि मुस्लिम समाजाप्रमाणे अस्पृश्यांनाही स्वतंत्र मतदारसंघ असावे अशी मागणी केली होती. भारताची राज्यघटना तयार करणाऱ्या राज्यघटना समितीत आणि मसुदा समितीतसुद्धा स्पृश्य हिंदूंचे बहुमत होते हे लक्षात घेऊन त्यांनी अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी मागण्या केल्या. त्यापैकी काही खालील मागण्या होत्या.

१) अस्पृश्यांना अल्पसंख्यांक म्हणून घोषित करावे.

२) अस्पृश्यांच्या हिताच्या रक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करावी.

३) अस्पृश्यांना घटनात्मक तरतूद करून काही सवलती द्याव्यात आणि अशी घटनात्मक तरतूद केवळ बहुमताने बदलता येणार नाही अशी व्यवस्था करावी.

अस्पृश्यांच्या हिताचे रक्षण करण्याच्या उद्देशानेच भारताच्या राज्यघटनेतील कलम ३३० ते ३४२ यात अस्पृश्यांसाठी आणि मागासलेल्या जाती-जमातींसाठी खास सवलती मान्य केल्या आहेत.

**सामाजिक विचार :**

डॉ.आंबेडकरांच्या एकंदर कार्यात सामाजिक सुधारणांना विशेषतः दलितांच्या उद्धाराच्या चळवळीला विशेष महत्त्व आहे. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यता नष्ट करणे आणि अस्पृश्यांचा सर्वांगीण विकास करणे हे आपल्या जीवनाचे पहिले ध्येय ठेवले होते.

ते म्हणतात की, लक्षात ठेवा तलवारीच्या धारेपेक्षा लेखणीची धार कायम टिकणार आहे आणि सर्वात लेखनी हे खतरनाक शस्त्र आहे. म्हणून हातात तलवार न घेता लेखणी घेऊन अन्यायावर मात करा. भारतीय समाजातील विविध समस्या सोडविण्यासाठी क्रांतिकारक मार्गाने उपाय योजना करण्याची नितांत गरज आहे असे त्यांना वाटत होते.

भारतीय समाजाच्या समस्या जाणून घेण्यासाठी त्यांनी भारतीय इतिहासाचे आणि धर्मग्रंथांचे सखोल अध्ययन केले. त्यांच्या सामाजिक विचारात स्त्रिया आणि अस्पृश्यांच्या विकासाचा विचार समाविष्ट आहे. सामाजिक दृष्ट्या स्त्रिया आणि अस्पृश्य व शूद्र हे सर्वात मागासलेले घटक आहेत. या घटकांना विकासाची समान संधी मिळाल्याशिवाय भारतीय समाजाचे दैन्य संपणार नाही हे त्यांनी लक्षात घेतले होते.

ही सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी जनतेची विवेक बुद्धी जागृत करून भारतीय समाजाच्या उभारणीचे ते स्वप्न पाहत होते. या स्वप्नपूर्तीसाठी हिंदू धर्मातील तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून समाज परिवर्तनासाठी अनेक मार्ग सुचविले. दलित आणि स्त्रियांच्या अधिकाराचा घटनेत समावेश केला.

**समाज सुधारणा विषयक विचार :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा समाज सुधारणाविषयक दृष्टिकोन १ ९व्या शतकातील नेमस्त सुधारकांपेक्षा गुणात्मक दृष्ट्या भिन्न होता. नेमस्त सुधारकांनी सुचविलेल्या सुधारणा उदा. विधवा-विवाह, केशवपण, विवाहाची वयोमर्यादा, इ. कौटुंबिक सुधारणा संबंधी होत्या. त्यामुळे त्या सुधारणांमधून मूलभूत अशा सामाजिक सुधारणा झालेल्या नाहीत, मूलभूत प्रश्न सुटलेला नाही असे मत डॉ.आंबेडकरांनी या संदर्भात व्यक्त केले आहे. इतर लहान लहान सामाजिक सुधारणा होण्यासाठी मुळात सामाजिक विषमतेचा प्रश्न सुटला पाहिजे असे त्यांना वाटत होते. नेमास्त सुधारक आणि डॉ.आंबेडकर यांच्या आणखी एक मुख्यतः फरक म्हणजे नेमस्त सुधारकांनी सुधारणांसाठी प्राचीन धर्मग्रंथांचा आधार घेतला आहे यावर मात्र डॉ.आंबेडकरांचा विश्वास नव्हता. अस्पृश्यता मान्य करणाऱ्या 'मनुस्मृति' या ग्रंथाची त्यांनी होळी केली होती. त्या काळातील नेमस्त सुधारकांचा समाज सुधारणा करताना हृदय परिवर्तनावर विश्वास होता. मात्र हृदय परिवर्तनावर मर्यादा असतात असे तार्किक मत डॉ.आंबेडकरांचे होते.

**स्त्रियांबद्दलचे विचार :**

ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात स्त्रियांच्या अधिकाराची चर्चा सुरू झाली होती. अस्पृश्य आणि स्त्री हे भारतातील सर्वात शोषित घटक मानले जात होते. त्यात हिंदू धर्मातील दलित स्त्री ही सर्वाधिक शोषित घटक आहे असे त्यांनी मानले. त्यांच्या मते 'दलित स्त्रीयांना दुहेरी शोषणाला सामोरे जावे लागते'. दुहेरी शोषण म्हणजे दलित म्हणून होणारे शोषण आणि स्त्री असल्यामुळे दलित पुरुषांकडून होणारे शोषण'. हिंदू कायद्यात एकसूत्रीकरण करण्यासाठी हिंदू कोड बिल संमत करण्यासाठी मोठा संघर्ष त्यांनी केला. महिलांचे अधिकार विशेषतः विवाह आणि पितृ संपत्ती विषयक अधिकार सुरक्षित करणारी ही मोठी सामाजिक सुधारणा होती. हे विधेयक संसदेत मान्य होऊ शकले नाही म्हणून सप्टेंबर इ.स १ ९५१ मध्ये त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

डॉ.आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व अनेक पैलूंनी युक्त असले तरी त्यात एक समान धागा होता तो आर्थिक हित पाहणारा होता. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या त्यांनी दिलेल्या मंत्रातूनच त्यांचे विचार सुस्पष्टपणे दिसून येतात. आंबेडकरांचे विचार सामाजिक, धार्मिक आणि नैतिक तत्त्वांवर आधारलेले आहेत. शोषक आणि शोषित हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू आहे. दबलेल्यांना उभारी देणे, शोषितांची जोखाडातून मुक्तता करणे हाच त्यांच्या विचारांचा मुलाधार आहे. सर्वांना स्वातंत्र्य,समता आणि न्याय मिळावा हाच त्यांच्या वैचारिक मांडणीचा प्रमुख हेतू आहे, याच हेतूसाठी लाखो अनुयायांसह त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

**शैक्षणिक विचार :**

मनुष्याला तर्कसंगतपणे विचार करण्याची कला ही फक्त शिक्षणातूनच अवगत होऊ शकते म्हणून डॉ. आंबेडकरांचे मुलगामी व तार्किक विचार हे त्यांनी प्राप्त केलेल्या सखोल ज्ञानावर आधारित आहे. हे ज्ञानाचे भांडार त्यांना केवळ शिक्षणामुळे प्राप्त झाले. त्यामुळे त्यांचे शिक्षण विषयक विचार जाणून घेणे गरजेचे ठरते.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने मनुष्याला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व विशद केले.

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो ते पेयील तो माणूस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही" असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे ते सांगत. समाजाच्या सर्व थरांपर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिक दृष्ट्या सशक्त होते. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे.

शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाजाच्या हितासाठी या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत, असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी ठेवावे . त्यांनी "पीपल्स एज्युकेशन सोसायटीची" स्थापना १ ९४६ साली करून मुंबईला सिद्धार्थ कॉलेज आणि औरंगाबादला मिलिंद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहित व समाज हिताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय असे ते मानित.

वरील सर्व विचार पाहता आपल्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तार्किक व मूलगामी स्वरूपांच्या विचारांचा बोध होतो.

**आपली प्रगती तपासा :**

१ डॉ.आंबेडकरांचे जातीव्यवस्था व अस्पृश्यतेबद्दलच्या विचारांचे महत्त्व विशद करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

२) डॉ.आंबेडकरांचे सामाजिक विचार स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

३) डॉ.आंबेडकरांचे महिला विषयक विचार स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :**

१) भोळे, भा. ल. (२००३) आधुनिक भारतातील राजकीय विचार, नागपूर: पिंपळापुरे पब्लिशर्स

२) पाटील व्ही. बी. (२०११) 'समग्र राज्यशास्त्र', पुणे: के. सागर प्रकाशन

३) आगरकर गो. ग. (१९९४), 'संपूर्ण आगरकर' पुणे: वरदा प्रकाशन

❄❄❄❄❄❄❄

# ४

# समाजवादी विचार

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.४ पंडित जवाहरलाल नेहरू

४.५ राम मनोहर लोहिया

## ४.१ उद्दिष्टे

" **समाजवादी विचार**" या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. नेहरूंचा लोकशाही समाजवाद समजून घेणे

२. समाजवादाच्या अंमलबजावणीसाठी पंडित नेहरूंनी सांगितलेले उपाय समजून घेणे.

३. नेहरूंचे व्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व आणि समाजाच्या कल्याणाचा विचाराची उपयुक्तता जाणून घेणे.

४. लोहिया हे पाश्चिमात्य समाजवाद नाकारून गांधीवादी समाजवाद सांगतात तो समजून घेणे

५. लोहियांनी समाजवादात बौद्धिक संकल्पनांची मांडणी केली ती अभ्यासणे.

६. लोहिया समाजवादाचे समर्थन करताना मार्क्सवाद व साम्यवाद नाकारतात हे समजून घेणे.

## ४.२ प्रास्ताविक

आधुनिक काळातील ज्या महत्वपूर्ण विचार प्रणालींच्या प्रभाव शासनप्रकार, तसेच राज्याचे आणि समाजाचे तत्त्वज्ञान यांच्यावर मोठ्या प्रमाणावर पडला, त्यात समाजवाद ही एक प्रणाली आहे. व्यक्ती आणि राज्य या दोघात व्यक्तीला दुय्यम स्थान देणाऱ्या विचारप्रणालीत समाजवादाचा अंतर्भाव केला जातो. व्यक्तीवादाच्या अतिरेकातून, भांडवलशाहीच्या निषेधातून, औद्योगिकीकरणाची प्रतिक्रिया म्हणून पुढे आलेली ही समाजवादाची विचारसरणी आहे असे मानले जाते.

उत्पादन साधनांची सार्वजनिक मालकी, कल्याणकारी राज्य आणि भरपूर प्रमाणात उत्पादित झालेल्या मालाचे समान विभाजन या तत्त्वाचा अंगीकार या विचारप्रणालीत येतो. आधुनिक औद्योगिक समाजातील कामगार, सर्वसामान्य उपभोक्ता, बेरोजगारी, उपासमार, पराकोटीची विषमता यांनी भरडून निघालेली जनता यांच्या बाजूने लढा देणारी विचारप्रणाली

असे या समाजवादाचे स्वरूप असते. पश्चिम युरोपात अनेक देशांमध्ये समाजवादी चळवळ उभारल्या गेल्या. त्यातून भारतीय बुद्धिवंत आणि विचारवंत देखील या समाजवादी विचाराकडे आकर्षिले गेले आणि त्यांनी आपले समाजवादाची तत्त्वज्ञान मांडले . यातून पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ.राम मनोहर लोहिया या भारतीय विचारवंतांनी आपले समाजवादी विचार मांडले.

## ४.३ विषय विवेचन

समाजवाद म्हणजे संपत्तीचे अधिक न्याय पद्धतीने वितरण. सर्व समाजाचे व्यापक हित ज्यात सामावलेले आहे, अशा तत्त्वांच्या आधारे आदर्श समाजाची निर्मिती म्हणजे समाजवाद. लोकशाही समाजवादी पक्षांना समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी बळाचा वापर अनावश्यक वाटतो. आधुनिक काळातील समाजवादाची वाटचाल ही जुलमी राज्याच्या विरोधात उभारलेल्या चळवळीतून आढळून येते.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील विचार आणि ठराव, देशाच्या राज्यघटनेची उद्देश पत्रिका, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे, आर्थिक नियोजन, अर्थव्यवस्था, निरनिराळी धोरणे, समाजवादी पक्ष चळवळी इत्यादीतून भारतातील समाजवादाचा स्वीकार झाला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू हे समाजवादी भारताचे स्वप्न मांडणारे दार्शनिक आणि समाजवादाचे शिल्पकार समजले जातात. रशियामधील साम्यवादाने प्रभावित झालेले नेहरू भारतासाठी मात्र लोकशाही समाजवादाचा अंगीकार करतात.

समाजवादाच्या विचारसरणीचा मूल्यात्मक आधार मानवता, भूतदया व बंधूभाव हे असतात. निम्नस्तरावरील समाज घटकांबाबत दया, करुणा त्यात असते. अन्याय, दुःख, दारिद्र्य यांनी पिडलेल्या लोकांना त्यातून बाहेर काढावे हा विचार असतो.

आज समाजवादी विचारप्रणाली जवळजवळ सर्वच देशांमध्ये काही राजकीय पक्षांनी स्वीकारलेली आहे. डावी विचारसरणी, पुरोगामी विचारसरणी, सुधारणावादी विचारसरणी असलेले असे पक्ष हे समाजवादी विचारसरणीचे पक्ष म्हणून ओळखले जातात. म्हणून अशाच समाजवादाची अपेक्षा पंडित जवाहरलाल नेहरू आणि राम मनोहर लोहिया करतात.

## ४.४ पंडित जवाहरलाल नेहरू

स्वातंत्र्याच्या चळवळीचा आढावा घेत असताना आपणास पंडित जवाहरलाल नेहरूंचाही विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. स्वतंत्र भारताचे पंतप्रधान या नात्याने देशात लोकशाही रुजविण्याचे अवघड कार्य त्यांनी केले. भारतातील भयानक असे दारिद्र्य, अज्ञान, प्रचंड सामाजिक, आर्थिक, प्रादेशिक भेद असलेल्या विषम भारतीय समाजात धर्मनिरपेक्षता, समाजवाद, सहिष्णुता, इ. मूल्यांनी परिपूर्ण अशी राजकीय संस्कृती रुजविण्याचे अतिशय अवघड असे कार्य त्यांनी केले. भारताचे आर्थिक आणि परराष्ट्र विषयक धोरण तर नेहरूंनीच दिलेली देण आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. नेहरूंनी ठरवलेल्या परराष्ट्रविषयक धोरणाने भारताच्या प्रतिमेला झळाळी आली व भारताने अलिप्तता वादाचा पुरस्कार केला.

### नेहरूंचा लोकशाही समाजवाद :-

इंग्लंडमध्ये शिकत असतानाच नेहरू समाजवादाकडे आकर्षिले गेले, परंतु त्यांचा तो त्या वेळेचा समाजवाद प्रत्यक्ष व्यवहारापेक्षा पुस्तकी ज्ञानावर आधारित होता. पुढे चालून त्यांच्या अभ्यासाला प्रत्यक्ष व्यवहाराची जोड मिळाली व ते अधिक वास्तववादी बनू लागले.

पंडित नेहरूंच्या समाजवादाचे मूळ त्यांच्यावर पडलेल्या मार्क्सवादाचा प्रभाव व जगाची चाललेली समाजवादाकडील आगेकूच तसेच साम्यवादी रशियाने केलेली प्रगती हेही एक त्यांच्या आकर्षणाची मुख्य कारण सांगता येईल. सन १ ९२६ मध्ये ते युरोपला गेले व तेथेच ते समाजवादी बनले. याच सुमारास ते रशियात गेले व रशियाच्या जलद प्रगतीमुळे ते भारावून गेले व त्यांच्या मनावर खोल ठसा उमटला. ते भारतात परत आले तेव्हा पूर्णपणे समाजवादी बनले होते. त्यांनी भारतात आल्यावर समाजवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारा गट निर्माण केला. १ ९२९ च्या लाहोर काँग्रेसच्या अध्यक्षपदावर असताना त्यांनी आपले समाजवादावर असणारी श्रद्धा दृढ केली. १ ९३६ मध्ये लखनऊ येथे काँग्रेसची धारणा ही समाजवादी असावी, असे त्यांनी स्पष्ट केले. १ ९५५ मध्ये आवडी येथे भरलेल्या काँग्रेसमध्ये समाजवादी समाज रचनेची गरज नेहरूंनी स्पष्ट केली. तर १ ९६३ च्या काँग्रेस अधिवेशनात समाजवादी कार्यक्रम धडाडीने अमलात आणण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली.

### समाजवादाची आवश्यकता :-

इंग्रज राजवटीमध्ये भारतीयांची प्रचंड प्रमाणात आर्थिक पिळवणूक झाली. देशातील जनता दरिद्री बनली. ब्रिटिशांचा खरा हेतू राजकीय सत्ता उपभोगने नसून भारतीयांची आर्थिक पिळवणूक करणे हा होता. देशात भयानक दारिद्र्य निर्माण झाले त्यामुळे जुनी अर्थव्यवस्था कोलमडून पडली व नवीन श्रीमंत भांडवलदार वर्ग उदयास आला. भारतामध्ये कोणत्याही प्रकारची औद्योगिक प्रगती न झाल्याने अवनती झाली. देशातील जनता ही शेतीवर अवलंबून असल्याने दारिद्र्यात आणि बेकारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. परकीय राजवट या अवनतीला जेवढी जबाबदार आहे, त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने येथील भांडवलदार जबाबदार आहेत आणि शेतकऱ्यांच्या मागण्या चिरडून टाकण्यात जमीनदारांचा फार मोठा हात आहे याची जाणीव नेहरुंना होती. अशा स्थितीत व्यापक असे सामाजिक, राजकीय, आर्थिक बदल घडून आले पाहिजे असे त्यांना वाटले म्हणून त्यांनी समाजवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यास सुरुवात केली. विशेषतः बुद्धिजीवी वर्ग व काँग्रेस कार्यकर्त्यात समाजवादी तत्त्वज्ञान खोलवर रुजवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

### नेहरूंच्या समाजवादाचे स्वरूप :-

नेहरूंच्या समाजवादाचे स्वरूप अतिशय व्यापक असे आहे. ते समाजवादाला केवळ अर्थशास्त्रीय सिद्धांत न मानता या देशात या पद्धतीद्वारे एक नवीन अशी समाजव्यवस्था निर्माण झाली पाहिजे ,असे ते म्हणतात. त्यांच्या समाजवादाचे स्वरूप आर्थिक, सामाजिक, राजकीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आहे. त्यात व्यक्तीच्या हक्काचा व राज्याच्या अधिकाराचा योग्य असा समन्वय साधला गेला आहे. नेहरूंनी केवळ समाजवादाचा स्वीकार केला नाही, तर लोकशाही समाजवादाचा स्वीकार केला आहे. युरोपात भांडवलशाही प्रधान लोकशाही आहे , त्यात व्यक्तीला स्वातंत्र्य प्रदान केले जाते; परंतु त्यामुळे समाजात आर्थिक

विषमता निर्माण होते, आर्थिक समताच नसेल तर राजकीय स्वातंत्र्य फोल ठरते. सोव्हियत रशियात आर्थिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न झाला; पण तेथील जनतेला स्वातंत्र्यास मुकावे लागले. म्हणूनच नेहरूंनी या दोन्ही पद्धतीचा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केला. त्यांना अभिप्रेत असलेल्या समाजवादात आर्थिक विषमता कमी करून व्यक्तीस स्वातंत्र्य बहाल करता येईल अशी व्यवस्था आहे.

**नेहरू प्रणित समाजवादाची वैशिष्ट्ये :-**

१**) भांडवलशाही अर्थव्यवस्थेला विरोध :-**

नेहरूंना अभिप्रेत असलेल्या लोकशाही समाजवादात भांडवलशाहीचे पूर्णपणे उच्चाटन करण्यात आले होते. नेहरू भांडवलदारी अर्थव्यवस्थेला सक्त विरोध दर्शवितात. भांडवलदारी अर्थव्यवस्थेत मजुरांचे व श्रमिकांचे शोषण होते व त्यामुळे समाज व्यवस्थेत विषमता निर्माण होते. मुठभर भांडवलदारांच्या हाती उत्पादनातील सर्व पैसा येतो व बहुसंख्य मजूर जनता ही दरिद्रीच राहते. भांडवलदारी व्यवस्थित गरीब हा गरीब व श्रीमंत हा श्रीमंतच बनत जातो. यामध्ये जे जास्त श्रम करतात त्यांना त्याचा जास्त फायदा मिळाला पाहिजे; परंतु तसे न होता या उलट अशी प्रक्रिया घडते. मुठभर लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण होते व श्रमिकांचे सतत शोषण चालू असते. सर्व समाजाचे नुकसान ती करते.समाजास आवश्यक असणाऱ्या वस्तूचे उत्पादन भांडवलदार करीत नाहीत.

२**) हिंसेचा त्याग / अहिंसेचा पुरस्कार :-**

नेहरू प्रणित समाजवादात हिंसा व सक्ती यांचा त्याग करण्यात आला आहे. लोकशाही पद्धतीने समाजवाद निर्माण होईल असा नेहरूंना विश्वास होता. कामगार व शेतकरी यांच्या भावना भडकवून समाजवाद निर्माण करता येणार नाही, असे त्यांचे स्पष्ट मत होते. संघटनेचे बळ हिंसाचारातून वाढत नसते, तर ते शांततामय मार्गाने वाढत असते. अर्थातच समाजवादाच्या कल्पनेने काही हितसंबंधीच्या स्वार्थाला इजा पोहोचणार, याची खात्री नेहरूंना होती व त्यामुळे समाजात संघर्ष अटळ ठरेल असे ते म्हणत; परंतु हा संघर्ष रक्तमय स्वरूपाचा नसून राज्याने लोकमताच्या आधारे बळाचा वापर करून भांडवलशाहीत गुंतलेले हितसंबंध वगळण्याचा प्रयत्न करावा. कुठल्याही का होईना परिस्थितीत दबावाचा बळाचा वापर राज्यसंस्थेस करावा लागतो, पण त्यात रक्ताचा थेंबही सांडता कामा नये.

३**) उत्पादन साधनांचे राष्ट्रीयकरण :-**

भांडवलशाहीच्या बाबतीत अपयशाची मालिका ठरली आहे. भांडवलशाही व्यवस्थेने एकेकाळचे प्रश्न सोडवले हे खरे, परंतु आजचे प्रश्न सोडविण्यासाठी भांडवलशाहीला पूर्णपणे अपयश आले आहे. तिने उत्पादनात वाढ घडवून आली, परंतु त्याचे वितरण करण्यात तिला अपयश आले, त्यामुळे आर्थिक विषमता व असमाधान मोठ्या प्रमाणात वाढले. नेहरूंना भांडवलशाही व साम्यवाद या दोन्ही पद्धतीतील दोषांची जाणीव होती. म्हणून त्यांनी या दोन्ही पद्धतीमधील गुणांचा समन्वय साधून मध्यम मार्ग निवडण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच त्यांनी संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. काही उद्योगधंद्यांची सुरुवात सरकारने करावी तर काही उद्योगधंदे खाजगी नियंत्रणाने चालवावेत. हळूहळू जनतेच्या हितास प्राधान्य द्यावे. हळूहळू सरकारने समाजवादाची कल्पना व्यापक करावी. महत्त्वाच्या उत्पादन साधनांवर

सरकारचे नियंत्रण आले, की शोषण थांबेल व राष्ट्रीयीकरणानंतर किमती कमी होतील व जनतेच्या कल्याणास खऱ्या अर्थाने वाव मिळेल.

**४) आवश्यक वस्तूंचे वितरण :-**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत संपत्तीची वाढ होते, परंतु त्यामध्ये गरीब हे गरीबच राहतात व श्रीमंत हे श्रीमंत होतात. याचे कारण असे, की तेथील वितरण पद्धतीत दोष निर्माण झालेले असतात. केवळ राष्ट्रीयकरणाने भीषण दारिद्र्याचा प्रश्न सुटत नाही, तर वस्तूंचे वितरण योग्य रीतीने झाले पाहिजे, तरच खरा समाजवाद अस्तित्वात येईल.

**५) दारिद्र्य निर्मूलन :-**

नेहरू असे म्हणतात, की मनुष्याचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे दारिद्र्य होय. दारिद्र्याचे निर्मूलन झालेच पाहिजे. तेच खरे समानतेचे सूत्र आहे असे नेहरू म्हणतात. विषमता निर्मूलनापेक्षा दारिद्र्य निर्मूलन महत्त्वाचे आहे. धनिकांचा पैसा हिसकावून घेऊन गरिबांना वाटणे म्हणजे दारिद्र्य निर्मूलनच नव्हे तर उत्पादन वाढवून त्याचे योग्य असे सर्वत्र वितरण करणे नेहरूंना अभिप्रेत आहे. दारिद्र्य निर्मूलनाबाबत ते कोणाशीही तडजोड करण्यास तयार नसत. दारिद्र्य निर्माण करणाऱ्या आणि ते सहन करणाऱ्या समाजावर ते कडक शब्दात प्रहार करीत, म्हणूनच जमीनदारी व तालुकादारी व्यवस्था त्यांच्या टिकेचा महत्त्वाचा विषय होता.

**६) आर्थिक नियोजन :-**

हे दोष टाळण्यासाठी यावर आर्थिक नियोजन हाच एक महत्त्वाचा उपाय असू शकतो, असे नेहरूंचे मत होते. सोवियत रशियाने अल्पावधीत केलेली प्रचंड प्रगती त्यांनी प्रत्यक्षात अनुभवली होती. भारतानेही त्या प्रकारच्या नियोजनाचा अवलंब करावा, असे त्यांचे स्पष्ट मत होते. शेती आणि औद्योगीकरणाच्या विकासासाठी आर्थिक नियोजनाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता होती, म्हणूनच त्यांनी पंचवार्षिक योजनांचा अवलंब केला.

**७) खाजगी मालमत्तेवर निर्बंध :-**

नेहरू हे लोकशाहीचे आणि व्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते, परंतु खाजगी मालमत्तेबाबत त्यांची मते ही वेगळ्या प्रकारची होती. समाजात संपत्तीचे केंद्रीकरण मूठभर लोकांच्या हाती झाले तर समाजात विषमता निर्माण होऊन समाजवादाचा पराभव होईल. त्यासाठी सामूहिक हितासाठी खाजगी मालमत्तेवर मर्यादा घालाव्यात, हक्क नष्ट करावेत, हक्कावर मर्यादा असाव्यात या मताचे ते होते.

**८) व्यक्ती स्वातंत्र्य :-**

नेहरूंनी मांडलेल्या समाजवादात व्यक्ती स्वातंत्र्याला वरचे स्थान देण्यात आले आहे. त्यांनी समाजाचा विचार अग्रक्रमाने केला असला तरी व्यक्ती स्वातंत्र्याकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांच्या समाजवादात व्यक्ती स्वातंत्र्य आणि व्यक्तिविकास यांना अग्रक्रम देण्यात आला होता. आचार, उच्चार, लेखन, धर्म व शिक्षण इ. स्वातंत्र्य लोकांना देण्यात यावेत. अर्थातच त्यावर थोड्याफार प्रमाणात मर्यादा देखील असाव्यात.

**समाजवादाच्या अंमलबजावणीसाठी नेहरूंनी सांगितलेले उपाय :-**

दारिद्र्याने पछाडलेल्या भारतासाठी समाजवादी समाजाची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी असे नेहरूंचे मत होते. देशाचा जर जलद विकास करावयाचा असेल तर त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी व त्यासाठी खालील उपायांचा अवलंब करण्यात यावा असे नेहरू यांनी सांगितले.

१. कुळकायदा त्वरित अंमलात आणावा, गैरहजर जमीनदार पद्धती बंद करावी, कसेल त्याची जमीन या तत्त्वाचा अवलंब करावा, कमाल जमीन धारणा पद्धत करावी, शेतकऱ्यांना विशेष सवलती देऊन कर्ज मुक्त करावे.

२. राज्याचे कर प्रणालीचे स्वरूप बदलले पाहिजे, आकारणीचे स्वरूप आधुनिक बनले पाहिजे. गरिबांकडून कमी कर व श्रीमंतांवर कराचा जास्त अधिभार लावावा. शेतीवर सुद्धा कर लावला पाहिजे, श्रीमंताकडून जास्त अधिकार घ्यावा, श्रीमंतांकडून जमा होणाऱ्या पैशाचा विनियोग उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी करावा. त्यामुळे उत्पादन वाढ होऊन विषमता कमी होण्यास मदत होईल.

३. श्रमिक व मजूर यांच्या कल्याणाकडे अधिक लक्ष द्यावे. त्यांच्या कामाचे तास, आजारपणाच्या सोयी-सवलती याबद्दल विचार करण्यात यावा, बेकारांना बेकारी भत्ता दिला जावा, बालमजुरी बंद करावी.

वरील उपायाचा अवलंब केल्याने समाजवाद प्रत्यक्ष अमलात येईल त्यामुळे देशाची प्रगती घडून येईल असे पंडित नेहरूंचे मत होते.

**आपली प्रगती तपासा :**

१ पंडित नेहरूंच्या लोकशाही समाजवादी विचारांचे मूल्यमापन करा.

____________________

____________________

____________________

____________________

२ आधुनिक भारताच्या उभारणीतील पंडित नेहरूंच्या योगदानाविषयी चर्चा करा.

____________________

____________________

____________________

____________________

३ पंडित नेहरूंच्या विचारांचे परीक्षण करा.

## ४.५ राम मनोहर लोहिया (१ ९१ ०-१ ९६७)

डॉ. राम मनोहर लोहिया हे देशातील एक प्रतिभाशाली विचारवंत होते. त्यांनी भारतीय समाजवादी विचार परंपरेला नवी दिशा व आयाम देण्याचा प्रयत्न केला. भारतातील नव्हे तर आशियाई व तिसऱ्या जगातील समाजवादी विचारांना वैचारिक बैठक देण्याचा प्रयत्न केला. समाजवादी तत्त्वज्ञानातील नकारात्मक आशय बाजूला सारून लोकशाही समाजवाद तत्त्वज्ञानाला भक्कम पायावर उभे करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे समाजवादी विचार बंडखोरीच्या स्वरूपाचे किंवा समाजाच्या अभिजात सिद्धांतापेक्षा वेगळेपण राखणारे होते. त्यांनी समाजवादाला तात्विकता, मार्क्सवाद आणि आंतरराष्ट्रीय साम्यवादाच्या जोखडातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. भारतीय परिस्थितीचा विचार करून समाजवादाला नाविन्यपूर्ण वळण देण्याचा प्रयत्न केला. भारतीय परिस्थितीत उपयुक्त ठरू शकतील या पद्धतीने समाजवादातील बौद्धिक संकल्पनांची मांडणी करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात समाजवादी चळवळीचे नेतृत्व केले. या चळवळीत आलेल्या अनुभवातून समाजवादी चिंतनात अनेक सैद्धांतिक परिवर्तने केली . आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात काँग्रेस पासून केली. स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक वर्ष काँग्रेस पक्षासाठी कार्य करीत राहिले. लोहियांच्या राजकीय जीवनावर गांधी विचार आणि चळवळीचा फार मोठा प्रभाव राहिलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसचा त्याग केला. काँग्रेसचा पराभव करण्यासाठी विरोधकांची मोट बांधण्याचा प्रयत्न केला.

### लोहीयांचे समाजवादाबद्दलचे विचार :-

लोहिया यांनी पाश्चात्य समाजवादाला नाकारून गांधीवादाच्या आधारावर नवीन समाजवादी विचारांची मांडणी करून वैचारिक क्षेत्रात भर घालण्याचा प्रयत्न केला. त्यांचे नवीन समाजवादी विचार भारताच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर आधारलेले आहेत. युरोप चा समाजवाद हा साम्यवाद आणि भांडवलशाहीचे च एक अपत्य आहे. समाजवादाचा योग्य पद्धतीने विकास घडवून आणायचा असेल तर त्याला साम्यवादी आणि भांडवलशाही पासून वेगळा करणे आवश्यक आहे. लोहिया यांनी समाजवादाशी गांधीवाद जोडण्याचा प्रयत्न केला. गांधीवादातील विकेंद्रीत अर्थव्यवस्था, साधनशुचितेचा विचार, लघु उद्योगांवर आधारित अर्थकारण आणि राजकीय विकेंद्रीकरणाचा वापर आपल्या समाजवादी सिद्धांतात विकसित करण्यासाठी केलेला दिसतो. लोहिया हे गांधी तत्त्वज्ञानावरील आशय व संकल्पनांचा वापर करून समाजवादाचे संकल्पित चित्र आपल्यासमोर उभे करतात.

लोहियांच्या समाजवादाचा गांधीवाद हा एकमेव आधार नाही. साम्यवाद आणि भांडवलशाहीतील काही महत्त्वपूर्ण मूल्यांचा देखील ते स्वीकार करतात. साम्यवादी आणि भांडवलशाहीतील अपूर्णता दूर करण्यासाठी गांधीवादाचा आधार घेतात. या दोन्ही

विचारधारा व्यक्ती आणि व्यक्तीच्या कार्यक्षमतेकडे दुर्लक्ष करतात, तर लोहियांचा समाजवाद अधिकत्तम कार्यक्षमतेवर भर देतो. व्यक्ती विकासाला वाव देणाऱ्या संकल्पनांना समाजवादात स्थान देतात. आनंददायी, तणावरहित, शारीरिक आणि आधुनिक दर्जा पूर्ण करणाऱ्या नव समाजवादी समाजाचे संकल्पचित्र रेखाटतात. लोहियांचे समाजवादी विचार पोथीनिष्ठ स्वरूपाचे नाहीत. त्यांना अनुभव आणि वास्तविकतेच्या आधारावर समाजवादी विचारांना एक नवा अर्थ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. लोकशाही, स्वातंत्र्य आणि व्यक्तीच्या अधिकारांचा समाजवाद संकल्पनेत समावेश केला. त्यांचा समाजवाद हा सर्वंकषवाद आणि कामगारांच्या हुकूमशाहीला विरोध करणारा आहे. पाश्चिमात्य पोथीनिष्ठ समाज वादाला पर्याय देणारा आणि आशियाई देशांना नवा मार्ग उपलब्ध करून देणारा आहे. राज्यव्यवस्थेसंबंधीचा पारंपारिक समाजवादी दृष्टिकोन अमान्य करून राज्याला अनिवार्य व उपयुक्त संस्था मानतात. समाजवादी व्यवस्थेत राज्यसंस्थेकडे अधिकाराचे केंद्रीकरण होणार नाही याची व्यवस्थित दक्षता घेऊन विकेंद्रीत राज्य व्यवस्थेचा पुरस्कार करतात. राजकीय आणि आर्थिक सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून खरा लोकशाही समाजवादी समाज स्थापन करण्याची स्वप्न पाहतात. लोकशाही समाजवादातील अंतिम व खरीखुरी सत्ता लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना व्यापक अधिकार बहाल करतात. श्रमिकांचे उत्पादन प्रक्रियेवर नियंत्रण राखणाऱ्या अर्थव्यवस्थेची निर्मिती करण्याचा प्रयत्न करतात. समाजवादाच्या माध्यमातून समता आणि न्याय प्रस्थापित करण्यावर भर देतात. मानवाच्या भौतिक आणि नैतिक गरजांमध्ये सुसंवाद साधून व्यक्तीला उत्तम जीवन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करतात. औद्योगिक विकासासोबत कृषी विकासाला देखील प्राधान्य देतात. राजकीय आणि आर्थिक सत्ता सर्वसामान्यांच्या आवाक्यात यावी म्हणून राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात विकेंद्रीकरणावर आधारलेल्या संस्था व व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. समाजवादी व्यवस्थेत नोकरशाहीचा वर चष्मा निर्माण होतो हे रशियाच्या उदाहरणावरून निदर्शनास आले आहे. नोकरशाहीच्या वाढत्या प्रभावाला रोखण्यासाठी उत्पादन आणि वितरण व्यवस्थेत सहकार तत्वाला महत्त्व देतात.

लोहिया समाजवादाचा आकृतीबंध मांडताना भारतीय परिस्थितीला आवर्जून प्राधान्य देतात. जमिनीचे फेरवाटप, बेरोजगारीचे निर्मूलन, कुटीर उद्योगांना महत्त्व, स्वयंसेवी संस्थांना महत्त्व, अल्प यंत्रावर आधारित उद्योगांना प्राधान्य, राजकीय केंद्रीकरण साधणाऱ्या सनदी सेवकांच्या पदाचा नायनाट आणि समतेला प्राधान्य इ. गोष्टींना आपल्या समाजवादी प्रारूपात महत्त्वपूर्ण स्थान देतात.आपल्या समाजवादी विचार हा अविकसित देशासाठी उपयुक्त ठरेल हा विश्वास प्रदर्शित करतात. लोहिया यांनी आपल्या समाजवादी विचारात शाश्वत क्रांतीचा अभिनव सिद्धांत मांडला आहे. राज्यकर्त्या वर्गाकडून कमी अधिक प्रमाणात दडपशाही व अन्याय हा होणारच आहे. या अन्यायाच्या विरोधात लढा देण्यासाठी कायम क्रांतिकारकांचा वर्ग असणे आवश्यक आहे. समाजवादी सत्तेवर आल्यानंतर देखील अन्याय हा सुरूच राहणार. या अन्यायाचा योग्य प्रतिकार करण्यासाठी समाजवादी व्यवस्थेत लढा देणाऱ्या क्रांतिकारकांची गरज असेल. समाजवादी व्यवस्थेत देखील अंकुश ठेवण्यासाठी क्रांतिकारक वर्ग आवश्यक मानतात.

लोहियांच्या मते, "समाजवादी पक्षाने सत्ता संपादनासाठी तुरुंग, फावडे आणि मतपेटीचा अवलंब करावा. अन्यायाविरोधात संघर्ष,संघर्षातून निर्माण झालेल्या शक्तीचा विधायक कार्यासाठी उपयोग आणि संघर्ष व विधायक कार्य यातून निर्माण झालेल्या जनमताच्या

आधारावर मतपेटी द्वारा सत्ता संपादनाचा प्रयत्न" या सत्ता संपादनाच्या तीन पायऱ्या समाजवादाच्या स्थापनेसाठी आवश्यक मानतात. मात्र भारतातील समाजवादी पक्षांनी संघर्ष, तुरुंग भारती आणि निवडणुकीच्या राजकारणावर भर दिला. फावडे मात्र कोणीही हातात न धरल्यामुळे संघर्ष व मतपेटी यांना जोडणारा विधायक कार्यक्रमातील दुवा समाजवादी पक्षांना होता आले नाही, ही समाजवादी पक्षाची शोकांतिका आहे. १ ९५२ च्या निवडणुकीत समाजवादी पक्षाच्या दारुण पराभवानंतर अशोक मेहता यांनी समान मतैक्याचे क्षेत्र शोधण्याचा सिद्धांत मांडला, तर लोहिया यांनी 'समान अंतराचा सिद्धांत' मांडला. या सिद्धांतानुसार काँग्रेस व कम्युनिस्टांशी समान अंतर ठेवणे अपेक्षित होते. लोहियांचा हा सिद्धांत बहुमताने स्वीकारण्यात आला. परंतु लोहिया यांनी समान अंतराचा सिद्धांत नाकारून बिगर काँग्रेसवादाचे तत्त्वज्ञान मांडले. काँग्रेसचा पराभव करण्यासाठी बिगर काँग्रेसी पक्षांना एकत्र आणण्याचा प्रयोग केला. लोहियांच्या प्रयोगामुळे पुढे अयोग्य परिणाम होऊन १ ९७६ मध्ये समाजवादी पक्ष नष्ट झाले.

डॉ.लोहिया हे भारतातील समाजवादी चळवळीतील प्रतिभाशाली विचारवंत होते. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाची रचना युरोपियन समुदायातील व्यवस्था लक्षात घेऊन केलेली आहे. ती आशिया आणि भारतातील समस्या सोडविण्याच्या दृष्टीने अपुरी आहे. मार्क्सवाद ही युरोपचे आशियाला गुलाम करणारे हत्यार आहे. या हत्यारापासून लांब राहणे श्रेयस्कर आहे. मार्क्सवादाने सांस्कृतिक घटकांकडे दुर्लक्ष केल्यामुळे ते तिसऱ्या जगासाठी उपयुक्त नाही. या निष्कर्षाप्रत लोहिया येतात. समाजवादाला मानवी चेहरा प्रदान करण्यासाठी मार्क्सवाद आणि भांडवल वादाला नाकारतात. कारण ही दोन्ही प्रारूप पाश्चिमात्य मूल्ये आणि गरजांवर आधारित आहेत. आफ्रो आशियाई देशांसाठी उपयुक्त नाहीत. भारत आणि आफ्रो-आशियाई देशांना उपयुक्त ठरू शकणाऱ्या समाजवादी सिद्धांताची ते मांडणी करतात.

लोहियांच्या समाजवादी विचारांत काही प्रमाणात उणिवा असल्या तरी त्यांचा समाजवाद देशात समतापूर्ण, समानाधिकारी आणि चांगली जीवन निर्माण करण्यास हातभार लावेल. भारतीयांच्या आकांक्षा चेतविण्याच्या दृष्टिकोनातून लोहियांचा समाजवाद उपयुक्त आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१ ) लोहियांच्या समाजवादाचे महत्त्व विशद करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

२) लोहिया यांनी केलेली साम्यवाद आणि भांडवलशाहीची चिकित्सा करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

३) आशियाई समाजवादाच्या विकासातील लोकांच्या भूमिकेविषयी चर्चा करा.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :**


१ ) दळवी. म .य. (१ ९९४), 'डॉ.राम मनोहर लोहियांचे वैचारिक योगदान', औरंगाबाद: कौशल्य प्रकाशन

२) दाभोळकर, देवदत्त (१ ९६०) 'लोकशाही समाजवाद', पुणे: संगम प्रकाशन

३) देवरे. पी. डी. आणि इतर (२००४)' आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत', जळगाव : प्रशांत प्रकाशन


❄❄❄❄❄❄❄